


महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

गुरुवार, दि. ०५ मार्च २०२६




मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : ०९९ | किंमत : ४ रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com

# तेलाचा भडका, रुपयाला तडाखा

## पश्चिम आशियातील संघर्षाचा परिणाम

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

अमेरिका-इस्रायल, इराण यांच्यातील युद्धाच्या परिणामी खनिज तेलाच्या किमतीतील भडक्याचे भांडवली बाजारात बुधवारी भीतीदायी पडसाद उमटले. सेन्सेक्स-निफ्टी जवळपास दीड टक्क्याने गडगडले, तर रुपयाने डॉलरमागे पहिल्यांदाच ९२ खालील पातळी ओलांडून, ९२.३५ असा ऐतिहासिक नीचांक दाखवला.



तेलाच्या वाढत्या किमती आणि व्यापारातील अडथळे हे आयातीवर मोठी मदार असलेल्या भारताच्या अर्थव्यवस्थेवर ताण आणणारे ठरतील. देशांतर्गत महागाईचा परिणाम आणि चालू खात्यावरील तूट आणखी वाढण्याच्या शक्यतेमुळे गुंतवणूकदारांत चिंतेचे वातावरण आहे. त्याचेच प्रतिबिंब १,१२२.६६ अंशांनी म्हणजेच १.४० टक्क्यांनी घसरलेल्या सेन्सेक्समध्ये दिसून आले. बुधवारी सलग चौथ्या सत्रात घसरण होत, सेन्सेक्स ८० हजारांखाली म्हणजेच ७९,११६.१९ पातळीवर स्थिरावला. निफ्टी निर्देशांकानेही सलग तिसऱ्या घसरणीतून सहा महिन्यांतील नीचांकी पातळी दाखवली. हा निर्देशांक ३८५.२० अंशांच्या नुकसानीसह २४,४८०.५० पातळीवर बंद झाला.

जगभरातील बाजारातील पडझडीचे पडसाद स्थानिक बाजारात उमटले. तथापि भारतीय बाजारांच्या तुलनेत कोरिया, जपान, हाँगकाँग या प्रमुख आशियाई बाजारांतील घसरणीचे प्रमाण खूपच अधिक आहे. आखातातील संघर्षामुळे, खनिज तेलाच्या आंतरराष्ट्रीय किमतीचा मानदंड असलेल्या ब्रेंट क्रूडची किंमत पिंपामागे ८२.७७ डॉलरपर्यंत वाढली. मागील दीड वर्षातील अर्थात जुलै २०२४ नंतर तेलाने गाठलेली ही सर्वाधिक किंमत आहे. गत चार सत्रांमध्येच ती जवळजवळ १७ टक्क्यांनी वाढली आहे. बुधवारच्या सत्रात मल्टी कमोडिटी एक्स्चेंजवर (एमसीएक्स) सोने आणि चांदीच्या किमतीही लक्षणीय वधारल्या.

वाढत्या अस्थिरतेमुळे गुंतवणूकदारांच्या संपत्तीत दोन सत्रांत १६.३२ लाख कोटी रुपयांची घसरण झाली आहे. याआधी सोमवारच्या सत्रातही सेन्सेक्स-निफ्टी निर्देशांकात प्रत्येकी सव्वा टक्क्यांहून अधिक घसरण झाली होती. मंगळवारी होळीनिमित्त सार्वजनिक सुट्टीमुळे बाजारात व्यवहार झाले नाहीत. आघाडीच्या समभागांमध्ये, लार्सन अँड टुब्रोने चार सत्रांत एकंदर १२ टक्क्यांची घसरगुंडी दाखवली आहे. त्यापाठोपाठ टाटा स्टीलमध्ये मोठी घसरण झाली आहे.

होर्मुझच्या सामुद्रधुनीतून ठप्प झालेल्या तेलाच्या वाहतुकीपाठोपाठ इराण युद्धातून जागतिक पुरवठा साखळी विस्कळीत करणारा परिणाम दिसून येत आहे. विशेषत: भारतातील औषधनिर्माण, आशियातील सेमीकंडक्टर आणि खतांसारख्या तेलावर आधारीत उत्पादनांपुढे संकट निर्माण झाले आहे. मालवाहू जहाजे आखातात अडकली आहेत. इराणविरुद्धच्या युद्धात अमेरिका निर्णायक, विनाशकारी आणि दया न दाखवता विजय मिळवत आहे, असे अमेरिकेचे संरक्षणमंत्री पिट हेग्सेट यांनी बुधवारी सांगितले. युद्धात यशस्वी होण्यासाठी आवश्यक असलेला वेळ घेतला जाईल, असे हेग्सेट म्हणाले.

इस्रायलने इराणपाठोपाठ लेबेनॉनवरही हल्ला केला असून लेबेनॉनची राजधानी बैरुतमधील इराणी दूतावास उडवून देण्याची धमकी दिली आहे. इस्रायलने बैरुतमधील इराणी दूतावासावर सशस्त्र हल्ला केला तर इराण जगभरातील इस्रायली दूतावासांना लक्ष्य करेल, अशा इशारा इराणी सशस्त्र दलाच्या प्रवक्त्याने दिला.

### अमेरिकी हल्ल्यात इराणच्या युद्धनौकेला जलसमाधी

इराणच्या 'आयआरआयएस देना' या युद्धनौकेचा अमेरिकेच्या पाणबुडीने वेध घेतल्याची माहिती अमेरिकेचे संरक्षणमंत्री पिट हेग्सेट यांनी दिली. ही युद्धनौका अरबी समुद्रात श्रीलंकेच्या किनाऱ्याजवळ बुडाली. दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिकेने प्रथमच अशा प्रकारे पाणबुडीने हल्ला केल्याचा हेग्सेट यांनी सांगितले. दरम्यान, या युद्धनौकेवरील ३२ जखमी सैनिकांना कोलंबोच्या रुग्णालयात दाखल करण्यात आल्याची माहिती श्रीलंकेच्या नौदलाने दिली.

## थोडक्यात...

### एकाच छताखाली विविध दाखले


**वसई : महसूल विभागाशी संबंधित दैनंदिन कामाला वेग देण्यासाठी आणि नागरिकांची प्रलंबित कामे मार्गी लावण्यासाठी तालुकास्तरावर महसूल विभागाकडून छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियानाचे आयोजन करण्यात आले आहे. या अभियानातंर्गत प्रलंबित फेरफार, सातबारा उताऱ्यातील दुरुस्ती, जात आणि रहिवासी प्रमाणपत्र, तसेच घररपट्टे वाटप, अशा विविध सुविधा एकाच छताखाली पुरवण्यात येणार आहेत. ग्रामीण भागातील सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, विद्यार्थी व महिलांचे महसूलविषयक प्रश्न तात्काळ निकाली काढून प्रशासन अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम व गतिमान करण्याच्या उद्देशाने वसई तालुक्यात जिल्हाधिकारी इंदुराणी जाखड, उपविभागीय अधिकारी शेखर घाटगे, तहसीलदार दिपक गायकवाड आणि निवासी नायब तहसीलदार शशिकांत नाचण यांच्या मार्गदर्शनाखाली छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर अभियान (टप्पा 1) राबविण्यात येणार आहे. 7 मार्च ते 15 मे दरम्यान हे शिबिर पार पडणार आहे. अभियानाच्या वेळापत्रकानुसार, मार्च महिन्यात 7 आणि 14 तारखेला मंडळ स्तरावर शिबिरे होतील.**

## राज्यातील ८६० सोनेग्राफी केंद्रांची घेणार झाडाझडती

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

ठाणे जिल्ह्यातील बदलापूर येथे आर्थिकदृष्ट्या दुर्बल महिलांना पैशांचे आमिष दाखवून त्यांच्या शरीरातील बीजांची बेकायदेशीर विक्री करण्याचे धक्कादायक रॅकेट उघडकीस आले आहे. या प्रकरणाची राज्य सरकारने गंभीर दखल घेतली असून, यात सहभागी असलेल्या डॉक्टरांना अटक केली आहे. या प्रकरणातील दोषींवर 'मकोका' सारख्या कडक कायद्यांतर्गत कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती गृह राज्यमंत्री योगेश कदम यांनी विधान परिषदेत दिली.

आमदार चित्रा वाघ यांनी बीज विक्री प्रकरणाबाबत लक्षवेधी सूचना मांडली. यावर उत्तर देताना योगेश कदम यांनी हे कारस्थान अत्यंत संघटित पद्धतीने करण्यात आला असल्याचे सांगितले. ठाण्यातील एका घरावर छापा टाकला असता तिथे कोणतेही अधिकृत आयव्हीएफ केंद्र नव्हते. नाशिकमधील एका नोंदणीकृत केंद्राच्या डॉक्टरांच्या माध्यमातून कारस्थान रचण्यात असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. या प्रकरणातील धक्कादायक बाब म्हणजे, एकाच महिलेची वारंवार नोंदणी करण्यासाठी खोट्या आधारकार्डचा वापर करण्यात आला. वेगवेगळ्या नावांनी नोंदणी करून या महिलांकडून वारंवार बीजांड काढले जात होते. आतापर्यंत



बदलापूर बीज विक्री प्रकरणात दोषींना मकोका लावणार : राज्यमंत्री योगेश कदम

अशा १० पीडित महिला समोर आल्या आहेत. या रॅकेटमध्ये वापरण्यात आलेली सोनोग्राफी यंत्रणाही अनधिकृत होती, ज्यावर आता कारवाई करण्यात आली आहे. नाशिकमधील संबंधित केंद्रातून औषधांचाही गैरवापर झाला आहे. तज्ज्ञ समित्या नियमितपणे तपासणी करत असल्या तरी या विशिष्ट प्रकरणात गुन्हेगारी स्वरूपाचे कटकारस्थान असल्याने पोलीस प्रशासन सखोल तपास करीत आहे, असे कदम यांनी सांगितले.

महाराष्ट्रात सुमारे ८६० आयव्हीएफ केंद्रे आहेत. या घटनेच्या पार्श्वभूमीवर गृह विभाग आणि आरोग्य विभाग संयुक्तपणे या सर्व केंद्रांची झाडाझडती घेण्यात येणार असून तिथे गैरप्रकार आढळल्यास कडक कारवाई केली जाईल. भविष्यात अशा फसवणुकीला आळा घालण्यासाठी केंद्रांवर 'बायोमेट्रिक पडताळणी' सक्तीची करण्याचा विचारही सरकार करत आहे, असे कदम यांनी सांगितले.

## गुंगीचे औषध देऊन विद्यार्थ्यांमध्येच लैंगिक अत्याचार

### इगतपुरीच्या समाजकल्याण वसतिगृहातील प्रकार : सात विधीसंघर्षित विद्यार्थ्यांना ताब्यात घेऊन गुन्हा दाखल



**इगतपुरी शहर : (समर्थ गांवकरी)**

शहरातील समाजकल्याण विभागाच्या वसतिगृहात विद्यार्थ्यांसोबत धक्कादायक घटना समोर आली आहे. वसतिगृहातील दहावीच्या वर्गात शिकणाऱ्या काही विद्यार्थ्यांनी याच वसतिगृहातील पाचवी ते सातवीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांवर लैगिंक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आल्याने सर्वत्र खळबळ उडाली आहे. शहरातील समाजकल्याण विभागाच्या वस्तीग्रहातील दहावीत शिक्षण घेणाऱ्या सात विधि संघर्षित विद्यार्थ्यांनी याच वस्तीगृहातील अल्पवयीन विद्यार्थ्यांना गुंगीचे औषध देऊन त्यांच्यावर शारीरिक व लैंगिक अत्याचार केल्याचा प्रकार नुकताच उघडकीस आला.या गैरप्रकाराने शिक्षण क्षेत्रात खळबळ उडाली आहे. या प्रकरणी घटनेकडे दुर्लक्ष केल्याप्रकरणी वसतिगृह अधिक्षक सुशांत दुधसागरे यांच्यासह सात विधिसंघर्षित विद्यार्थ्यांविरुद्ध पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.या पार्श्वभूमीवर पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील यांनी बुधवार ( ता. ४ रोजी ) भेट देऊन पोलीस निरीक्षक सारिका अहिरराव यांना मार्गदर्शन करून आवश्यक त्या सुचना करून प्रकरणाचा लवकरात लवकर छडा लावण्याच्या सूचना केल्या. गेल्या सात महिन्यापासून हा प्रकार सुरू असल्याने मोठ्या विद्यार्थ्यांच्या भितीपोटी पीडित मुलांनी या प्रकाराची वाच्यता केली नाही. दरम्यान वसतिगृह अधीक्षक सुशांत रमेश दुधसागरे यांना पीडित मुलांनी माहिती दिली होती.मात्र त्यांनी या गंभीर बाबीकडे दुर्लक्ष केल्याने त्यांच्यावरही गुन्हा दाखल करण्यात आला. या वसतीगृहात राहून दहावीच्या वर्गात शिक्षण घेणाऱ्या सात विधिसंघर्षित विद्यार्थ्यांनी वसतिगृहातीलच पाचवी ते आठवीच्या वर्गात शिकणाऱ्या अल्पवयीन विद्यार्थ्यांना गुंगीचे औषध भांगेच्या गोळ्या देऊन वसतिगृहाच्या बाहेरील झुडपात बळजबरीने नेऊन त्यांच्याशी वेळोवेळी अनैसर्गिक शारीरिक व लैंगिक संबंध केले.या घृणास्पद प्रकाराने तालुक्यातील खळबळ उडाली आहे. या प्रकरणी संशयित सात विधिसंघर्षीत विद्यार्थी व वसतिगृह अधिक्षक यांच्या विरोधात बालकांचे लैंगिक अत्याचार व महाराष्ट्र आणि रॅगिंग प्रकरणी गुन्हा दाखल झाला आहे. पुढील प्रकरणाचा अधिक तपास पोलीस अधिक्षक बाळासाहेब पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सारिका आहिरराव उपनिरीक्षक कांचन भोजने गोपनिय विभागाचे पोलीस हवालदार निलेश देवराज हे पुढील तपास करीत आहेत.

दिवाळीपासून आमच्यावर बळजबरीने आत्याचार सुरु होता. वसतिगृहातील मोठे विद्यार्थी आम्हाला मारहाण करत गुंगीच्या गोळ्या देऊन निर्जनस्थळी नेत आत्याचार करीत असत.कोणालाही काही सांगितल्यास मारण्याची धमकी देत असल्याने आम्ही खुप घाबरलो होतो.

**- पिडीत विद्यार्थी**

गुन्ह्यातील १० वीत शिकणाऱ्या ७ विद्यार्थ्यांना बुधवारी ताब्यात घेतल्यानंतर या सर्व विद्यार्थ्यांची इगतपुरी ग्रामीण रुग्णालयात मेडीकल करण्यात आली. या सर्व विद्यार्थ्यांना गुरुवार ५ रोजी नाशिक येथील प्रधान बाल न्यायालय मंडळात हजर करणार आहे. वसतिगृह अधिक्षक यांच्या जबाबानंतर सदर गुन्हयात हलगर्जी करणाऱ्या वसतिगृहातील चालकांवर गुन्हे दाखल करण्यात येणार आहे.

**- सारिका अहिरराव, पोलीस निरीक्षक**

माझी नेमणुक या वसतिगृहात २६ जानेवारी २०२६ रोजी झाली होती. हा प्रकार गेल्या अनेक महिन्यांपासून सुरू होता. मात्र माझ्या कानावर हा प्रकार आल्यावर मी वसतिगृहातील काम पाहाणाऱ्या संबंधितांना सांगितला होता. मात्र मला गप्प राहण्याची धमकी दिल्यामुळे मी सदर प्रकार विद्यार्थ्यांच्या पालकांना सांगितल्यानंतरच पोलीसांनी पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली. त्यामुळे या प्रकरणाचा माझ्याशी काहीही संबंध नाही.






# वाशिम येथे राज्यस्तरीय पत्रकार अधिवेशन उत्साहात संपन्न

## समाजातील प्रत्येक घटकाला न्याय देण्यासाठी पत्रकारांनी पुढाकार घ्यावा – केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव

वाशिम : (समर्थ गांवकरी)

समाजात घडणाऱ्या घटना व प्रश्नांवर सत्य आणि निःपक्षपाती दृष्टिकोन ठेवून पत्रकारांनी आपल्या लेखणीच्या माध्यमातून समाजातील प्रत्येक घटकाला न्याय मिळवून देण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन केंद्रीय आयुष मंत्री नामदार प्रतापराव जाधव यांनी केले. पत्रकार हा समाज आणि शासन यांच्यामधील महत्त्वाचा दुवा असून शासनाच्या कामकाजावर लक्ष ठेवणे, समाजाला जागृत करणे आणि चांगल्या गोष्टींना प्रोत्साहन देणे ही जबाबदारी पत्रकारांनी सातत्याने पार पाडावी, असेही त्यांनी नमूद केले. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई व महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार, दि. २८ फेब्रुवारी रोजी वाशिम येथील वैकुंठधामवासी मातोश्री सौ. स्नेहलता पुनमचंद सोमाणी परिसर, वाटाणे लॉन येथे राज्यस्तरीय पत्रकार अधिवेशन, पुरस्कार वितरण व पदाधिकारी सन्मान सोहळा उत्साहात पार पडला. उद्घाटन केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ह.भ.प. दिनकरराव वाटाणे होते. विशेष उपस्थिती म्हणून भागवताचार्य प.पू. रमाकांत व्यास, प.पू. गजानंद माऊली, प्रदेश सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी पत्रकारितेचे जनक आचार्य बाळशास्त्री जांभेकर व मातोश्री स्नेहलता सोमाणी यांच्या प्रतिमांचे पूजन करून दीपप्रज्वलन करण्यात आले.

या अधिवेशनात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना पुरस्कार प्रदान करण्यात आले. केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांना 'महाराष्ट्र भूषण' सन्मान देण्यात आला. भागवताचार्य डॉ. रमाकांत व्यास यांना 'संत सेवाश्री', दिनकरराव वाटाणे यांना 'वारकरी सेवा', डॉ. हेमराज लाहोटी, डॉ. हरीश बाहेती, डॉ. सरोज बाहेती यांना 'विदर्भ भूषण', श्रीमती शिलाताई राठी व ज्येष्ठ पत्रकार माधवराव अंभोरे यांना 'जीवन गौरव' पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

तसेच विविध समाजसेवक, उद्योजक, पत्रकार व संस्थांना राज्यस्तरीय पुरस्कार, सन्मानचिन्ह, सुवर्णपदक व 'विश्व कल्याण प्रार्थना' प्रदान करण्यात आली. राज्यभरातील जिल्हाध्यक्ष व पदाधिकाऱ्यांनाही सन्मानित करण्यात आले.

अधिवेशनाच्या द्वितीय सत्रात 'पत्रकारांचा डीएनए काय?' आणि 'सायबर युगातील माध्यमे व मूल्यनिष्ठ पत्रकारिता' या विषयांवर चर्चासत्र आयोजित करण्यात आले. ज्येष्ठ संपादक डॉ. राजेश राजोरे यांनी सत्य, संयम आणि समाजहित हाच पत्रकाराचा खरा डीएनए असल्याचे प्रतिपादन केले. सामाजिक माध्यमांवरून पसरवल्या जाणाऱ्या चुकीच्या माहितीबाबत पत्रकारांनी सजग राहण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली.

प्रदेश सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे यांनी संघटनेच्या कार्याचा आढावा घेत पत्रकारांसाठी 'लाडका पत्रकार योजना' सुरू करण्याची मागणी मांडली.

### १५ ठरावांना एकमुखी मंजुरी

अधिवेशनादरम्यान महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने पत्रकारांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर एकूण १५ महत्त्वपूर्ण ठराव मंजूर करण्यात आले. ठरावांचे वाचन डॉ. विश्वासराव आरोटे यांनी केले. उपस्थित सर्व प्रतिनिधींनी एकमुखाने या ठरावांना मंजुरी दिली. कार्यक्रमात संत सावता माळी क्रीडा मंडळाच्या विद्यार्थ्यांनी शिवकालीन युद्धकलेचे प्रात्यक्षिक सादर केले. वारकरी दिंडी, लेझीम पथक व विविध सांस्कृतिक सादरीकरणांनी सोहळ्याला विशेष रंगत आणली. राज्यभरातील पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांना आकर्षक बॅग, डायरी, पेन व दिनदर्शिका भेट देण्यात आली. वाशिम येथे अनेक वर्षांनंतर राज्यस्तरीय पत्रकार अधिवेशनाचे यशस्वी आयोजन झाल्याने जिल्ह्याच्या नावाची राज्यभरात चर्चा होत आहे.







## राष्ट्रसंतांचे विचार काळाची गरज – आचार्य हरिभाऊ वेरुळकर



वाशिम : (समर्थ गांवकरी)

धार्मिकता आणि आध्यात्मिकतेचे खरे ज्ञान समाजात रुजणे अत्यंत आवश्यक आहे. आज समाजामध्ये मोठी विसंगती दिसत असून व्यसन, विभिचार आणि अनैतिकतेला अनेक जण प्राधान्य देत असल्याचे चित्र दिसते. ही बाब निश्चितच चिंतनीय आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी ग्रामगीताच्या माध्यमातून समाजप्रबोधन करून सुसंस्कारित पिढी निर्माण करण्याचे महान कार्य केले. "मानवता हे धर्म मेरा" हा संदेश त्यांनी दिला. त्यामुळे राष्ट्रसंतांच्या विचारांची आज समाजाला नितांत गरज असल्याचे प्रतिपादन गुरुकुंज आश्रमचे आजीवन प्रचारक आचार्य हरिभाऊ वेरुळकर गुरुजी यांनी केले.

स्थानिक वैकुंठधामवासी मातोश्री सौ. स्नेहलता पुनमचंद सोमाणी परिसर, वाटाणे लॉन येथे शनिवार २७ फेब्रुवारी रोजी आयोजित जिल्हास्तरीय श्री गुरुदेव कार्यकर्ता संमेलनाच्या उद्घाटन प्रसंगी त्यांनी हे विचार व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वारकरी सेवक दिनकरराव वाटाणे होते. मंचावर अतिथी म्हणून आजीवन प्रचारक ह.भ.प. नामदेवराव गव्हाळे महाराज, अध्यात्म गुरुकुलचे संचालक रवी मानव, ह.भ.प. सागर महाराज परिस्कर, स्वागताध्यक्ष गिरधरीलाल सारडा, जिल्हा सेवाधिकारी सुनील दशमुखे, आयोजक कार्याध्यक्ष निलेश सोमानी, अॅड. सुरेश टेकाळे, विज्ञान भारतीचे जिल्हा संयोजक प्रा. राजेश गोरुले, समाजसेवी मुख्य समन्वयक डॉ. हरीश बाहेती, ह.भ.प. पंकजपाल महाराज, ह.भ.प. लक्ष्मणराव आवटे दादा, ज्ञानेश्वर कवळे महाराज, बोडस महाराज, अॅड. सौ. भारती सोमानी, सौ. वृषाली टेकाळे, सौ. दीपा वानखेडे आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व राष्ट्रसंतांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. त्यानंतर सर्व मान्यवरांचा सन्मानचिन्ह, बुके व विश्व प्रार्थना किट देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी रवी मानव यांनी "राष्ट्रसंतांची सामाजिक क्रांती व आजचा संघर्ष" या विषयावर मार्गदर्शन करत वाशिम जिल्ह्यातील प्रत्येक महाविद्यालयात प्रबोधनाची वारी काढण्याची घोषणा केली.

ह.भ.प. सागर महाराज परिस्कर यांनी समाजामध्ये जातीधर्माच्या नावावर सुरू असलेल्या प्रवृत्तींवर चिंतन करण्याची गरज व्यक्त केली. समाजात एकोपा राहावा आणि चांगल्या कार्याला बळ मिळावे यासाठी कीर्तनकार व प्रवचनकारांनी कोणालाही न घाबरता सत्य सांगण्याचे आवाहन त्यांनी केले.

प्रा. राजेश गोरुले आणि डॉ. हरीश बाहेती यांनीही आपले विचार मांडले. ह.भ.प. नामदेवराव गव्हाळे महाराज यांनी कर्मकांडावर प्रहार करत कोरोनाच्या काळात डॉक्टर देवासारखे उभे राहिल्याचे सांगितले. खरा देव माणसातच आहे आणि आजच्या युवा पिढीला प्रबोधनाची गरज आहे, असेही त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाचे संचालन निलेश सोमानी यांनी केले, तर अॅड. सुरेश टेकाळे यांनी आभार मानले. या गुरुदेव कार्यकर्ता मेळाव्यासाठी जिल्ह्यातील गुरुदेव मंडळी, महिला भगिनी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता सामुदायिक प्रार्थना व चिंतन कार्यक्रमाने झाली.

































# राज्यस्तरीय पत्रकार अधिवेशनात ठरावांची जोरदार मांडणी

(समर्थ गांवकरी)




पत्रकारांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर ठोस भूमिका घेत महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने वाशिम येथे राज्यस्तरीय एकदिवसीय अधिवेशन उत्साहात पार पडले. अधिवेशनात राज्यभरातील पत्रकार प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी पत्रकारांच्या हक्क, सवलती व कल्याणकारी योजनांबाबत एकूण १२ महत्त्वपूर्ण ठराव मंजूर करण्यात आले.

**अधिवेशनातील प्रमुख ठराव पुढीलप्रमाणे**

- शासनमान्य यादीवरील लघु वृत्तपत्रांना मुद्रण व कोऱ्या कागदावरील जीएसटीमधून सूट देण्यात यावी, कारण सध्या भरलेली जीएसटी रक्कम रिबेट स्वरूपात परत मिळत नाही.
- ज्येष्ठ पत्रकार सन्मान निधीच्या अटी शिथिल करण्यात याव्यात. ३० वर्षांचे सलग पुरावे, नेमणूक पत्र, वेतनपत्र, सेवामुक्ती पत्र आदी कारणांवरून वयोवृद्ध पत्रकारांना नाकारले जाणे थांबवावे.
- महापुरुषांच्या जयंतीप्रमाणेच स्वराज्यजननी राजमाता जिजाऊ, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर आणि आद्यशिक्षिका सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त राज्य शासनाकडून दर्शनी जाहिराती वितरित कराव्यात.
- अधिस्विकृती पत्रासाठीच्या अटी सुलभ कराव्यात. ग्रामीण पत्रकारांना कमी कागदपत्रांमध्ये अधिस्विकृती द्यावी. लघु साप्ताहिकांना किमान ३ व लघु दैनिकांना किमान ५ अधिस्विकृती पत्रांचा कोटा द्यावा.
- शासनमान्य यादीवर नसलेल्या पण नियमित प्रकाशित होणाऱ्या वृत्तपत्रांना १ मे, १५ ऑगस्ट, २६ जानेवारी व दिवाळी निमित्त वर्षातून ४ जाहिराती पूर्वीप्रमाणे पुन्हा सुरू कराव्यात.
- पत्रकारांसाठी स्वतंत्र घरकुल योजना राबवून बँक कर्ज प्रक्रियेत येणाऱ्या अडचणी दूर कराव्यात व इतर आवास योजनांमध्ये आरक्षण द्यावे.
- आरटीई कायद्यातून संपादक व पत्रकारांच्या पाल्यांसाठी विशेष आरक्षण व सवलती द्याव्यात.
- पीआरजीआय प्रेस सेवा पोर्टलप्रमाणे युट्यब व डिजिटल पोर्टल माध्यमांच्या नोंदणीसाठी स्वतंत्र यंत्रणा उभारून अधिकृत प्रमाणपत्र देण्यात यावे.
- अधिस्विकृतीधारक पत्रकारांना राज्य परिवहन मंडळाच्या रातराणी शिवाई ई-बस सेवेत इतर बसेसप्रमाणे प्रवास सवलत द्यावी.
- सत्य वृत्तांना रोखण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या हक्कभंग तरतुदींचा पुनर्विचार करून माध्यम व अभिव्यक्ती स्वातंत्र्य अबाधित ठेवावे.
- मागील शासनकाळात जाहीर करण्यात आलेल्या पत्रकार कल्याणकारी मंडळ व वृत्तपत्र विक्रेता कल्याणकारी मंडळाच्या शासन निर्णयाची तातडीने अंमलबजावणी करावी.
- वृत्तपत्र नोंदणी व दुरुस्तीसाठी आकारली जाणारी १००० रुपयांची फी व ५०० रुपयांच्या बाँडवरील शपथपत्राची अट रद्द करून सर्व सेवा पूर्वीप्रमाणे मोफत कराव्यात व शपथपत्र साध्या कागदावर स्वीकारावे.
- अधिवेशनात सर्व ठराव एकमताने मंजूर करण्यात आले असून राज्य शासनाने यावर सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली. पत्रकारांच्या हक्कांसाठी संघटना अधिक तीव्रपणे लढा उभारेल, असा निर्धारही अधिवेशनात व्यक्त करण्यात आला.
























# मास्टरमाईंड प्रज्ञाशोध परीक्षेत गुणवत्ता यादीत 12 विदयार्थी चमकले



**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

राज्यास्तरीय मास्टरमाईंड प्रज्ञाशोध परीक्षेत हिंद सेवा मंडळाची प्राथमिक शाळा,बागडपट्टी विभागातील इयत्ता चौथी मधील चिन्मय म्हस्के हा राज्यात दुसरा आला. तसेच जिल्हास्तरीय गुणवत्ता यादीत जिविका ताकपेरे - जिल्हयात पाहिली, राजकुमार निसाद - जिल्हयात पहिला, आदिती खेडकर -केंद्रात प्रथम,गायत्री गायकवाड -तालुक्यात तीसरी,इयत्ता तीसरी मधील सेजल शेळके -जिल्हयात सहावी,लाड सर्वेश -जिल्हयात सातवा,श्रावणी जाधव- तालुक्यात प्रथम, विश्वजीत गंगावणे- तालुक्यात तिसरा, इयत्ता दुसरी मधील अमृता बेरड -जिल्यात दुसरी,गीत जपे जिल्हयात दुसरी,समृध्दी पठारे - तालुक्यात तिसरी आली आहे. स्पर्धा परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांना मुख्याध्यापक विठ्ठल उरमुडे,सौ. मनिषा साळी, मुदस्सिर पठाण, सौ.अरुणा धाडगे, सौ.विदया पोतदार, अभिजित जवादे, श्रीम्. मनिषा जंगम आदी शिक्षकांनी मार्गदर्शन केले आहे. स्पर्धा परीक्षेतील गुणवंत विदयार्थी म्हणजे शाळेची शान आहे.स्पर्धा परीक्षेचे तयारी घेण्यासाठी शाळेतील सर्व शिक्षक अत्यंत परिश्रम घेतात. दरवर्षीप्रमाणे हिंद सेवा मंडळाचे प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी निकालाची परंपरा कायम राखली आहे.असे गौरवोद्गार शाळेचे चेअरमन मधुसूदन सारडा यांनी काढले. सर्व यशस्वी विदयार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे कौतूक हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष शिरीष मोडक, मानद सचिव संजय जोशी,कार्याध्यक्ष डॉ.रमेश झरकर यांनी केले.



नांदेड जिल्हा : शहरी व ग्रामीण भागातील सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, विद्यार्थी व महिला यांच्या महसूल विभागाशी संबंधित दैनंदिन प्रश्नांचे निराकरण करून तक्रारींचा सत्वर निपटारा करण्याच्या उद्देशाने 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल अभियान' राबविण्यात येत आहे. महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम व गतिमान करण्यासाठी या अभियानांतर्गत नांदेड जिल्ह्यातील सर्व सहकारी गृहनिर्माण संस्थांचे अध्यक्ष व सचिव यांची कार्यशाळा शनिवार 07 मार्च 2026 रोजी सकाळी 11 वाजता नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय येथे आयोजित करण्यात आली आहे. या कार्यशाळेत नोंदणी व मुद्रांक विभाग तसेच सहकार विभागाशी संबंधित कायदे, नियम व कार्यपद्धती याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात येणार आहे. गृहनिर्माण संस्थांची निर्मिती झाल्यानंतर त्यांच्या उपविधीनुसार अध्यक्ष/सचिवांकडून भागधारकांना प्लॉट/सदनिका वाटप केले जाते.

## थोडक्यात बातम्या...



### कोतुळमध्ये पारंपारिक पद्धतीने वीरांचा पाडवा उत्साहात!

कोतुळ (स. गांवकरी) : मंगळवार, दि. ३ मार्च रोजी कोतुळ येथे प्रतिवर्षीप्रमाणे वीरांचा पाडवा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. गावातील वेशीपासून सुरू झालेल्या या पारंपरिक सोहळ्याला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. यावेळी रामायण, महाभारत तसेच ऐतिहासिक आणि पौराणिक व्यक्तिरेखांवर आधारित श्रीराम, हनुमान, रावण, छत्रपती शिवाजी महाराज, पोतराज आदी विविध वेशभूषा साकारून तरुणांनी पारंपरिक फेर धरत नृत्य सादर केले. ढोल, ताशा आणि पिपाणीच्या गजरात रात्री ८ वाजता खटपट नाका येथून सुरुवात झालेला पाडवा सुमारे साडेतीन तास रंगला. कार्यक्रमानंतर खटपट नाका गणेश व सांस्कृतिक मंडळाच्या वतीने उत्कृष्ट वेशभूषाधारकांना परीक्षकांच्या निर्णयानुसार रोख बक्षिसे प्रदान करण्यात आली. प्रथम क्रमांकास विशेष पारितोषिक देण्यात आले. त्यानंतर सर्व वीरांनी खंडोबा मंदिरात जाऊन तळी भंडार विधी पार पाडला. या पारंपरिक सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी गावातील सामाजिक कार्यकर्ते, तरुण व सेवाभावी मंडळांचा मोलाचा सहभाग लाभला.



### आदिवासी भागात फुलते स्ट्रॉबेरी; मधुकरराव पिचड यांचे स्वप्न साकार!

अकोले (स. गांवकरी) : अकोले तालुक्यातील आदिवासी भागात स्ट्रॉबेरी लागवडीचा यशस्वी प्रयोग फळाला आला असून दिवंगत मधुकरराव पिचड यांचे "आदिवासी बांधव आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हावेत" हे स्वप्न आज प्रत्यक्षात साकार होताना दिसत आहे. साहेबांनी शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीसाठी स्ट्रॉबेरी लागवड व खेकडा पालन यांसारखे पूरक व्यवसाय सुरू करण्याची संकल्पना मांडली होती. वाढत्या पर्यटनाचा लाभ स्थानिक शेतकऱ्यांना मिळावा, यासाठी त्यांनी सातत्याने समाजसेवक अनंत महादू घाणे, तुकाराम खाडे, सुरेश गभाले, रामदास पिचड, सुनील पवार, राजू भारमल, बुधा गांगड, सागर रोंगटे आदी कार्यकर्त्यांशी चर्चा केली. सन २०२४ मध्ये बायफच्या मार्गदर्शनाखाली अनंत महादू घाणे व तुकाराम खाडे यांच्यासह सहा शेतकऱ्यांनी दोन गुंठ्यात प्रायोगिक तत्त्वावर स्ट्रॉबेरी लागवड केली. पहिल्याच वर्षी ८० ते ९० हजार रुपये उत्पन्न मिळाल्याने हा प्रयोग यशस्वी ठरला. त्यानंतर दुसऱ्या वर्षी १९ शेतकऱ्यांनी पुढाकार घेतला, तर तिसऱ्या वर्षी ४९ शेतकऱ्यांना रोपे उपलब्ध करून देण्यात आली. आज या भागातील शेतकऱ्यांना स्ट्रॉबेरीमुळे चांगले आर्थिक बळ मिळत असून पर्यटकांनाही ताजी व दर्जेदार स्ट्रॉबेरी उपलब्ध होत आहे. "हीच साहेबांना खरी श्रद्धांजली," अशी भावना अनंत घाणे व तुकाराम खाडे यांनी व्यक्त केली.

## जाहीर नोटीस

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अकोले यांचे कार्यालय ता. अकोले, जि. अहमदनगर यांचे न्यायालयात...**

क्र.कावि/जन्म/मृत्यु नोंद/२५/२०२६ अकोले दि.०४/०३/२०२६

तमांम नागरिकांस कळविण्यात येते की,

ज्याअर्थी अर्जदार **श्रीम. संगिता जयवंत घोरपडे, रा.मान्हेरे**, ता. अकोले जि. अहिल्यानगर यांनी जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ कलम १३(३) अन्वये अर्जदार **यांचा मुलगा कु. निलेश जयवंत घोरपडे याचा जन्म दि. १९/०९/२०१५ रोजी मान्हेरे** येथे झाला असल्याची नोंद ग्रामपंचायत कार्यालय **मान्हेरे**, ता. अकोले यांचे जन्म-मृत्यु रजिस्टरला नोंद आदेश होणेकामीचा अर्ज मे. तहसिल कार्यालय येथे दाखल केला आहे.

तरी **श्रीम. संगिता जयवंत घोरपडे, रा.मान्हेरे**, ता.अकोले जि. अहिल्यानगर **यांचा मुलगा कु. निलेश जयवंत घोरपडे याचा जन्म दि. १९/०९/२०१५ रोजी मान्हेरे** येथे झाला आहे. सदर जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय **मान्हेरे**, ता.अकोले, जि. अहिल्यानगर येथे जन्माची नोंद होण्याबाबत कोणाची काही हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत योग्य त्या कागदपत्राच्या पुराव्यांसह हरकत मे. तहसिल कार्यालयासमोर हजर होऊन पुराव्या निशी दाखल करावी अन्यथा सदर मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत प्राप्त न झाल्यास सदर जन्माची नोंद करण्यास कोणाचीही हरकत नाही, असे समजुन मे. तहसिलदार साहेबांसमोर पुढील योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल. तदनंतर कोणाचीही कोणतीही तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

आज दि. ०४/०३/२०२६ रोजी सही व शिक्क्यानिशी दिले असे.

**कामगिरी क्लर्क**

**हुकूमावरुन,**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अकोले**

# VISTA 2K26 ला उत्स्फूर्त प्रतिसाद – २००० विद्यार्थ्यांचा भव्य सहभाग

**पुणे : (समर्थ गांवकरी)**



साईबालाजी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या भव्य शैक्षणिक, क्रीडा आणि व्यवस्थापन महोत्सव VISTA 2K26 ची दिमाखदार सांगता उत्साहपूर्ण वातावरणात २२ फेब्रुवारी ते २८ फेब्रुवारी २०२६ दरम्यान पार पडली. यंदाच्या महोत्सवात तब्बल २००० हून अधिक विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धांमध्ये सक्रिय सहभाग नोंदवत कार्यक्रमाला अभूतपूर्व प्रतिसाद दिला. यापूर्वी आयोजित करण्यात आलेल्या ड्युअथलॉन आणि मॅरेथॉन स्पर्धांना १००० पेक्षा अधिक स्पर्धकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला होता. विशेष म्हणजे या स्पर्धांमध्ये RFID ट्रॅकिंग तंत्रज्ञानाचा वापर करून स्पर्धकांच्या वेळेची अचूक नोंद करण्यात आली होती, ज्यामुळे स्पर्धा अधिक पारदर्शक आणि तांत्रिकदृष्ट्या सक्षम ठरल्या. "VISTA 2K26 – द ऑलिम्पिक डिस्टन्स ड्युअथलॉन" हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या क्रीडागुणांना चालना देणारा ठरला. शैक्षणिक क्षेत्रात १९वी अनिल रघुवंशी स्मृती राष्ट्रीय बिझनेस प्लॅन स्पर्धा मोठ्या उत्साहात पार पडली. विविध महाविद्यालयांमधून आलेल्या संघांनी नाविन्यपूर्ण व्यवसाय कल्पना सादर करून परीक्षकांचे लक्ष वेधले. सांस्कृतिक स्पर्धांनी महोत्सवात रंगत आणली. संस्थेचे अध्यक्ष प्रा.मनीष मुंदडा यांनी आपल्या मनोगतात सांगितले, "VISTA 2K26 हा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी एक सक्षम व्यासपीठ ठरला आहे. केवळ शैक्षणिक गुणवत्ता नव्हे, तर नेतृत्व, नवोन्मेष आणि क्रीडागुण यांना चालना देणे हेच आमचे ध्येय आहे. २००० विद्यार्थ्यांचा सहभाग ही आमच्यासाठी अभिमानाची बाब आहे." तसेच संस्थेच्या सचिव प्रा. निरुपमा मुंदडा यांनी नमूद केले, "विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, संघभावना आणि स्पर्धात्मक वृत्ती निर्माण करणे हा VISTA चा मुख्य उद्देश आहे. यंदाच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे आमचा विश्वास अधिक दृढ झाला असून, पुढील वर्षी हा महोत्सव अधिक व्यापक स्वरूपात आयोजित केला जाईल." समारोप सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते विजेत्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला.

२००० विद्यार्थ्यांच्या विक्रमी सहभागामुळे VISTA 2K26 ने यंदा नवा इतिहास घडवला असून, हा महोत्सव संस्थेच्या शैक्षणिक परंपरेतील एक अभिमानास्पद पर्व ठरला आहे.

# एम. एम. पवार यांना 'आदर्श शिक्षक' पुरस्काराने सन्मानित

**भिवंडी : (समर्थ गांवकरी)**



जप जीवाला बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने विद्या मंदिर, मांडा-टिटवाळा येथील सहाय्यक शिक्षक एम. एम. पवार यांना नुकतेच राज्यस्तरीय 'आदर्श शिक्षक' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. शिक्षण क्षेत्रातील २५ वर्षांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत हा सन्मान प्रदान करण्यात आला. एम. एम. पवार हे गेली पावशतक विद्यार्थ्यांना दर्जेदार व गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याचे कार्य करीत असून ते सामाजिक कार्यातही सक्रिय आहेत. त्यांच्या अध्यापनातून शाळा, गाव आणि देशाचे भविष्य घडविणारी गुणवंत पिढी तयार होत असल्याचे मान्यवरांनी गौरवोद्गार काढले. त्यांच्या आदर्श कार्यामुळे राष्ट्रउभारणीला शाश्वत बळ मिळत असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. संस्थेचे अध्यक्ष एन. ए. कदम, सचिव तुकाराम मोंडकर, निवड समिती अध्यक्ष किसन बोंद्रे तसेच उपाध्यक्षा करुणा बांगर यांच्या हस्ते पवार यांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. या सन्मानाबद्दल एम. एम. पवार यांच्यावर विविध स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# विविध मागण्यांसाठी आमजद खान दौलत खान यांचे निवेदन

**वसमत : (समर्थ गांवकरी)**



वसमत येथील कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये काम करणाऱ्या हमाल मापाडी कामगारांच्या विविध प्रलंबित प्रश्नांकडे लक्ष वेधण्यासाठी हमाल मापाडी संघटनेचे संचालक आमजद खान दौलत खान यांनी बाजार समितीचे सचिव यांना सविस्तर निवेदन सादर केले आहे. या निवेदनात कामगारांच्या हिताशी संबंधित महत्त्वाच्या मागण्या करण्यात आल्या आहेत.

निवेदनानुसार, हलदीच्या बिट व लिलाव प्रक्रियेबाबत काही ठोस निर्णय घेण्याची मागणी करण्यात आली आहे. हलदीचा लिलाव "कुपा" पद्धतीने ऑनलाइन टेंडर प्रणालीद्वारे आठवड्यातून किमान तीन वेळा नियमितपणे सुरू ठेवण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच कोणत्याही कारणास्तव लिलाव बंद ठेवायचा असल्यास हमाल मापाडी संघटनेला किमान एक दिवस आधी लेखी कळविण्यात यावे, अशी अट घालण्यात आली आहे. हलदीचे झालेले बिट तात्काळ मोजून (माप लावून) उचलण्यात यावेत, जेणेकरून कामगार व व्यापाऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागू नये, अशीही मागणी संघटनेने केली आहे. कामगारांच्या सुरक्षेबाबतही महत्त्वाच्या मागण्या निवेदनात नमूद करण्यात आल्या आहेत. हमाल-मापाडी कामगार, गाडीवान, फडकरे व मुनीम यांचा अपघात विमा उतरविण्यात यावा, तसेच अपघात किंवा गंभीर आजाराच्या प्रसंगी उपचारासाठी बाजार समितीकडून तातडीची मदत म्हणून प्रत्येकी ₹20,000 (अक्षरी वीस हजार रुपये) देण्यात यावेत, अशी ठोस मागणी करण्यात आली आहे. याशिवाय, माथाडी बोर्डाची अमलबजावणी बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात तात्काळ करण्यात यावी, जेणेकरून कामगारांना कायदेशीर संरक्षण व हक्क मिळतील, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

# सह्याद्री व्हॅली आभियांत्रिकी महाविद्यालयाचे स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न



**राजुरी : (समर्थ गांवकरी)**

(ता.जुन्नर) येथील महारिया चारीटेबल ट्रस्टचे सह्याद्री व्हॅली आभियांत्रिकी महाविद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन "सृजन " २०२६, दिनांक १८ ते २८ फेब्रुवारी दरम्यान उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. या स्नेहसंमेलनाचे उद्घाटन संस्थेचे अध्यक्ष व्ही. आर. दिवाकरण उप अध्यक्ष किशोरभाई पटेल, सेक्रेटरी गणपत कोरडे, संस्थेचे खजिनदार सचिन चव्हाण सर, संचालक नागेश आस्पात, डॉ. के. आर. भानुशाली, प्राचार्य डॉ. संजय झोपे, उपप्राचार्य बालारामडू यांच्या हस्ते दिपप्रज्वलन करून करण्यात आले. तद्प्रसंगी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. या स्नेह संमेलनातर्गत इनडोअर व आउटडोअर विविध क्रीडा प्रकार घेण्यात आले त्यामध्ये हॉलीबॉल, कबड्डी, क्रिकेट आणि इ स्पोर्ट, बुद्धिबळ, कॅरम म्युझिकल चेअर इत्यादी क्रीडा प्रकारात उत्फूर्त सहभाग नोंदवला. त्याचबरोबर पोस्टर प्रेसेंटेशन, डिजिटल पोस्टर कॉम्पिटिशन, मेहंदी, रंगोली आणि विविध डेज सेलिब्रेट करण्यात आले. त्यामध्ये मिस मॅच डे, रोज डे चॉकलेट डे, रेट्रो डे, ट्विन्सडे, ट्रॅडिशनल डे आणि हॉरर ड्रामा इत्यादी कलाप्रकारात विद्यार्थी आणि विद्यार्थिनींनी उत्फूर्त सहभाग नोंदवला.

विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा, म्हणून विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये एकपात्री अभिनय, समूह गीत गायन, नृत्य, कला, लावणी, नाटक,, इत्यादी. कलाप्रकार विद्यार्थ्यांनी सादर केले. या कार्यक्रमांनी स्नेहसंमेलनाची रंगत वाढवली. आठ दिवस चाललेल्या या स्नेहसंमेलनाच्या "सृजन" थीम अंतर्गत कार्यक्रमांनी प्रा. कविता खताळ, प्रा. कविता खेमनर प्रा. सिताराम कणसे, प्रा. सतीश नेहे प्रा.रांधवन भागवत यांच्या नेतृत्वाखाली त्यांच्या चांगलीच उंची गाठली. विद्यार्थ्यांचे सादरीकरण पाहुन पालक तसेच आलेले प्रमुख पाहुणे यांनी उत्स्फूर्त दाद दिली व विद्यार्थ्यांचे त्यांनी कौतुक करून त्यांना प्रोत्साहन दिले. तर परीक्षक म्हणून ग्रंथपाल उद्धव भारती, प्रा. स्वप्नाली कदम यांनी परिक्षण केले. या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती संस्थेचे अध्यक्ष व्ही. आर. दिवाकरण उपअध्यक्ष किशोरभाई पटेल, सेक्रेटरी गणपत कोरडे, संस्थेचे खजिनदार सचिन चव्हाण सर, संचालक नागेश आस्पात, डॉ. के. आर. भानुशाली, प्राचार्य डॉ. संजय झोपे, उपप्राचार्य पी. बालारामडू, जीवन शेठ शिंदे सहाय्यक पोलीस निरीक्षक अमोल पन्हाळकर, पप्पुशेठ डोंगरे ,सर्व विभागप्रमुख व मोठ्या संखेने विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे संयोजन सर्व शिक्षक व शिक्षेकेत्तर कर्मचारी यांनी केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. कविता खताळ आणि प्रा. कविता खेमनर यांनी केले तर आभार प्रा. सतीश नेहे यांनी मानले.

# 'धम्म-यात्रा २०२६' व कालकथित दादासाहेब रूपवते यांची १०१ वी जयंती उत्साहात साजरी!

**शेंडी (ता. अकोले) : (समर्थ गांवकरी)**





२८ फेब्रुवारी रोजी शेंडी-भंडारदरा येथे 'धम्म-यात्रा २०२६' व कालकथित का. दादासाहेब रूपवते यांच्या १०१ व्या जयंतीनिमित्त भव्य कार्यक्रम उत्साहात पार पडला. सामाजिक, शैक्षणिक व बौद्ध चळवळीतील कार्यकर्त्यांची मोठी उपस्थिती यावेळी लाभली.

सकाळच्या सत्राची सुरुवात भगवान गौतम बुद्ध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले तसेच सर्व महापुरुषांना अभिवादन करून करण्यात आली. त्यानंतर का. दादासाहेब रूपवते, का. प्रेमानंद रूपवते व का. स्नेहजाताई रूपवते यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करण्यात आले. पंचशील ध्वजरोहण व बुद्ध वंदनेचा कार्यक्रम पार पडला. जपान येथून आलेले भंते तेरासावा गुरुजी व पुणे येथील भंते नागघोष यांनी उपस्थितांना धम्म-देसना देत बौद्ध तत्त्वज्ञानाचा संदेश दिला. आदरणीय सुशिलाबाई दादासाहेब रूपवते यांच्या प्रमुख उपस्थितीत सकाळचे सत्र पार पडले.

दुपारी शेंडी गावातील का. यशवंतराव भांगरे यांच्या पुतळ्याला अभिवादन करून भव्य मिरवणूक काढण्यात आली. विविध गावांतील पारंपारिक वाद्य ताफे तसेच महिलांच्या लेझीम पथकांनी वातावरण भारावून टाकले. 'जय भीम' आणि 'बुद्धम शरणं गच्छामि'च्या घोषणांनी परिसर दुमदुमला. मुख्य धम्म सभेचे स्वागत व प्रास्ताविक उत्कर्षा रूपवते यांनी केले. सभेचे प्रमुख वक्ते ज्येष्ठ विचारवंत डॉ. रावसाहेब कसबे, प्रा. आनंद देवडेकर, आमदार डॉ. किरण लहामटे तसेच कॉ. डॉ. अजित नवले यांनी आपल्या भाषणातून सामाजिक परिवर्तन, समता व बौद्ध धम्माचा मार्ग यावर विचार मांडले.

सभेच्या अध्यक्षस्थानी ॲड. संघराज रूपवते होते. समाजाप्रती केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल मा. बाबुराव निकाळे, मा. बन्सीभाऊ त्रिभुवन, मा. आर. एस. अभंग व मा. सुरेश रोकडे यांना 'का. दादासाहेब रूपवते जीवन गौरव पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मा. पोपटराव सोनवणे व मा. विनय घोसाळे यांनी केले. या कार्यक्रमासाठी दिलीप भांगरे, विजय वाकचौरे, विनय सावंत, एम. डी. सोनवणे, सुधाकर देशमुख, सुरेश कोते, व्ही. एम. बैचे, हौसाबाई जगधने, अनुराधा आहेर, अजीज वोहरा, वैभव मोकळ, रविंद्र पवार यांच्यासह धम्मयात्रा ग्रामीण व मुंबई कमिटीचे सर्व कार्यकर्ते उपस्थित होते. तसेच बहुजन शिक्षण संघ, भारतीय बौद्ध महासभा व समता सैनिक दल यांचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले. अकोले, संगमनेर, नाशिक, नगर, इगतपुरी व पुणे परिसरातून आलेल्या अनुयायांनी कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. धम्म, समता आणि सामाजिक परिवर्तनाचा संदेश देणारी ही 'धम्म-यात्रा २०२६' शेंडी-भंडारदरा परिसरासाठी प्रेरणादायी ठरली.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# सारडा महाविद्यालयात "प्रयोगसिद्ध लोककला"

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

- या विषयावरील आंतरविद्याशाखीय राष्ट्रीय चर्चासत्र संपन्न
- लोककला या समाजाचा सांस्कृतिक वारसा : लोकसाहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक प्रा. डॉ. उत्तम पटेल



शतकोत्तर वाटचाल करणाऱ्या हिंद सेवा मंडळाच्या पेमराज सारडा महाविद्यालयातील मराठी विभाग व संशोधन केंद्राने "प्रयोगसिद्ध लोककला"या विषयावरील आंतरविद्याशाखीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन केले होते. पालघर येथील लोककलावंत घांगळीवादक श्री.सोनू म्हसे आणि तारपावादक श्री.मनोहर भोये यांच्या हस्ते घांगळीवादन आणि तारपावादन ,तसेच दीपप्रज्वलन करून या राष्ट्रीय चर्चासत्राचे उद्घाटन करण्यात आले.यावेळी हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष प्रा.शिरीष मोडक हे या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.तर कार्याध्यक्ष आणि वरिष्ठ महाविद्यालयाचे चेअरमन डॉ.रमेश झरकर,मानद सचिव संजय जोशी,कनिष्ठ महाविद्यालयाचे चेअरमन डॉ.पारस कोठारी यांची प्रमुख उपस्थिती लाभली. या राष्ट्रीय चर्चासत्राचे बीजभाषण गुजरात येथून आलेले लोकसाहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक प्रा.डॉ.उत्तम पटेल यांनी केले. स्वागत आणि प्रास्ताविक महाविद्यालयाच्या प्राचार्य माहेश्वरी गावित यांनी केले.यावेळी डॉ.गावित म्हणाल्या,"लोककला या समाजाचा सांस्कृतिक वारसा, परंपरा आणि सामाजिक अस्मिता दर्शवतात. लोककला या समाजाचे प्रतिबिंब असल्याने त्यांचे जतन करणे, ही काळाची गरज आहे. जागतिकीकरणाच्या युगात लोककला ही विविधतेची साक्ष देते. आणि मानवी सर्जनशीलतेचे प्रदर्शन करते.हे लोककलांचे महत्त्व लक्षात घेऊन 'प्रयोगसिद्ध लोककला 'या विषयावरील राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन केले आहे. "लोकसाहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक प्रा.डॉ.उत्तम पटेल म्हणाले,"आदिवासी संस्कृती ही आपला वारसा आहे. तिचे रक्षण करणे हे आपले कर्तव्य आहे.या संस्कृतीचा देखावा आपण करू शकत नाही परंतु,समीकरण बदलले आहे. संगणक,उत्तर आधुनिकता,जनजागृती, मोबाईल, इंटरनेट,आर्थिक गरजा आणि बाजारपेठांमुळे भारतातील आदिवासी कलाकारांना आधुनिक माध्यमातून प्रसिद्धी आदर आणि पैसा मिळवता आला आहे.फेसबुक आणि युट्यब सारख्या माध्यमाद्वारे या कला इतर देशांमध्ये पोहोचल्या आहेत. यामुळे त्यांच्या कलेचे अवमूल्यन होता कामा नये. लोककलाकारांनी त्यांच्या कलेशी प्रामाणिक राहिले पाहिजे.त्यांच्यातील आदिम मन आजही जिवंत आहे.आणि जोपर्यंत आदिम मन आहे तोपर्यंत लोककला अशीच राहील. उद्घाटन सत्राचे अध्यक्ष प्रा.शिरीष मोडक यांनी 'प्रयोगसिद्ध लोककला ' या विषयावर आयोजित केलेल्या राष्ट्रीय चर्चासत्रा सारख्या उपक्रमाचे कौतुक केले आणि चर्चासत्राला शुभेच्छा दिल्या. उद्घाटन सत्राचे सूत्रसंचालन पाहुण्यांचा परिचय आणि आभारप्रदर्शन डॉ.नवनाथ भोंदे यांनी केले. दुसऱ्या सत्राचे अध्यक्ष लोकसाहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक डॉ.संजय बोरुडे तर तज्ज्ञ साधन व्यक्ती लोककलेचे ज्येष्ठ अभ्यासक भगवान राऊत हे होते. यावेळी भगवान राऊत यांनी सामूहिक लोककलांचे विवरण केले.तसेच लोककलावंतांची आणि लोककलांची होणारी उपेक्षा याविषयी खंत व्यक्त करून लोककलांचे जतन व संवर्धन करणे आवश्यक असल्याचे मत मांडले.

# आ. नवघरे यांच्या पाठपुराव्याला अखेर यश!

**वसमत : (समर्थ गांवकरी)**



विधानसभा मतदारसंघातील शेतकऱ्यांसाठी अत्यंत आनंदाची आणि दिलासादायक बातमी समोर आली आहे. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या सिद्धेश्वर उपसा जलसिंचन योजनेला अखेर शासनाची मान्यता मिळाली असून, या यशामागे आमदार राजुभैया नवघरे यांचा सातत्यपूर्ण आणि ठाम पाठपुरावा निर्णायक ठरला आहे.

ही योजना कार्यान्वित व्हावी यासाठी आमदार नवघरे यांनी मंत्रालय स्तरावर अनेक बैठका घेतल्या. दिवंगत उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली या विषयावर सविस्तर चर्चा झाली होती. तसेच जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडेही वेळोवेळी पाठपुरावा करण्यात आला.

हिंगोली जिल्हा हा राज्यपाल सिंचन अनुशेषात मोडत असल्याने या भागातील सिंचन प्रकल्पांना प्राधान्य देणे आवश्यक होते. हा अनुशेष दूर करून वसमत मतदारसंघातील सिंचन क्षेत्र वाढवण्याचा निर्धार आमदार नवघरे यांनी केला होता. अखेर त्या प्रयत्नांना यश आले असून, सिद्धेश्वर उपसा जलसिंचन योजनेच्या सर्वेक्षण व अन्वेषणालाही मंजुरी देण्यात आली आहे.

या योजनेमुळे वसमत मतदारसंघातील पांगरा शिंदे सर्कल, अंबा सर्कल, शिरडशहापूर सर्कल, पुरजल सर्कल आणि पूर्णा सर्कल मधील अनेक गावे सिंचनाखाली येणार आहेत. अंदाजे ३,००० ते ४,००० हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येणार असून, वसमत तालुक्यातील २५ पेक्षा अधिक आणि औंढा तालुक्यातील १५ गावांतील शेतकऱ्यांना मोठा फायदा होणार आहे.

या योजनेला मंजुरी मिळण्यात स्वर्गीय अजितदादा पवार यांचे मोठे योगदान होते. मात्र, आज ते आपल्या सोबत नसल्याची खंत सर्वांना आहे. यापूर्वीही त्यांनी पूर्णा नदीवरील पोटा, पिंपळगाव कुटे आणि परळी दथरथे येथील बंधाऱ्यांना संभाजीनगर येथील कॅबिनेट बैठकीत मंजुरी दिली होती.

# मराठी राजभाषा गौरव दिन व राष्ट्रीय विज्ञान दिनाचा कुमशेत शाळेत उत्साहपूर्ण सोहळा




**जुन्नर तालुका: (समर्थ गांवकरी)**

जुन्नर तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा कुमशेत येथे दिः-२८ फेब्रुवारी,शनिवार मराठी राजभाषा गौरव दिन व राष्ट्रीय विज्ञान दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.ज्ञान,जिज्ञासा व भाषा अभिमानाचा सुंदर संगम या संयुक्त उत्सवात अनुभवायला मिळाला,कार्यक्रमास शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष अशितोष डोके,शिरोली बुद्रुक कृषी सोसायटीचे माजी संचालक शिवाजी डोके, देविदास वाणी,महेंद्र वाणी, माजी केंद्रप्रमुख विठ्ठल डोके, खंडू भगत माजी सेंट्रल बैंक अधिकारी,आजीजा इनामदार, अनिल डोके,विकास दुधाळ, सोनाली डोके,मयुर भगत,हर्षदा डोके,अंगणवाडी सेविका प्रियंका डोके,माजी अंगणवाडी सेविका सुलोचना डोके तसेच विद्यार्थी,पालक व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. मराठी भाषा गौरव दिनानिमित्त प्रथम प्रभात फेरी व शालेय दिंडी काढण्यात आली.मराठी माझी मायबोली,ज्ञानाची भाषा मराठी भाषा. अशा घोषणांनी परिसर दुमदुमला. विद्यार्थ्यांनी कविता सादरीकरण करत मराठी भाषेचा गौरव केला रिया दुधाळ,श्रृती डोके,वेदनी डोके, स्वरा डोके,रुद्र डोके,विराज वाणी,तनुज डोके,साई डोके, अनन्या डोके,पूर्ण डोके,कृष्णा डोके,देवांश डोके,आरुष डोके, आरोही भगत,ईश्वरी शेलार, अथर्व डोके,आलिम इनामदार आदी विद्यार्थ्यांनी प्रभावी सादरीकरण केले.

# मुलींनी निर्भय बनलेच पाहिजे

**ओतूर : (समर्थ गांवकरी)**

छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र आपणास जीवनामध्ये योग्य ते मार्गदर्शन करते,तसेच जीवनात यश मिळवण्यासाठी आपण त्यांचे गुण अंगीकारावे, शिवकालीन युगामध्ये स्त्रियांना जो सन्मान मिळत होता तो सन्मान आज कालच्या परिस्थितीतही मिळवून देणे ही आपली सर्वांची जबाबदारी आहे त्याचबरोबर प्रत्येक मुलीने निर्भय बनले पाहिजे असे आवाहन करिअर मार्गदर्शक, चाईल्ड फंड इंडिया संस्थेचे बँड अँबीसिडर आणि महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे पुणे जिल्हा उपाध्यक्ष,तथा जेष्ठ पत्रकार रविंद्र भोर यांनी केले. डुंबरवाडी ताः-जुन्नर येथील गजानन महाराज शिक्षण प्रसारक मंडळाचे शरदचंद्र पवार कॉलेज ऑफ इंजिनियरिंगच्या विद्यार्थिनींना निर्भय कन्या अभियाना अंतर्गत व्याख्यान आयोजित केले होते.

# ओबीसी राष्ट्रवादी काँग्रेस शहर जिल्हाध्यक्ष पदी दिपक खेडकर तर कार्याध्यक्ष पदी नितीन घोडके यांची निवड

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**



राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे माजी राष्ट्रीय अध्यक्ष व माजी उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या विचाराने व राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष व उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजितदादा पवार, प्रदेशाध्यक्ष खा.सुनिल तटकरे, आमदार संग्राम जगताप यांच्या मान्यतेने राष्ट्रवादी काँग्रेस च्या शहर जिल्हाध्यक्ष पदी दिपक रामदास खेडकर व कार्याध्यक्ष नितीन घोडके यांना आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देण्यात आले.

याप्रसंगी राष्ट्रवादी शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, माजी नगरसेवक दगडू मामा पवार, माणिकराव विधाते, नगरसेवक सुरेश बनसोडे, नगरसेवक कुमार सिंह वाकळे पाटील, रेवनाथ पवार, विकी जगताप, किरण मेहेत्रे, किरण गुंजाळ, शैलेश सत्रे, संतोष हजारे, मनोज ताठे, अरुण शिंदे, ब्रिजेश ताठे, गणेश जाधव, संकेत लोंढे, महेश गाडे, भैय्या भागवत, पियुष हजारे, महेश सुडके, सौरभ जरे, संकेत ताठे, स्वप्रील पडोळे, अतुल पडोळे, विश्वास शिंदे, प्रसाद बनकर, किरण जावळे, यश लिगडे, आशोक पवार, योगेश कोरेकर, संजय कोतकर, अमित भूतकर, योगेश भुजबळ, अक्षय भगत, योगेश आजबे, कान्हा भूतकर, राम वाडेकर, सुरज चांदगुडे, दादा जागताप, स्वप्रील मुसळे, आशीष भगत, ऋषिकेश ताठे, रोहित देवराईकर, निलेश सत्रे, दादा टेमकर, सागर खेडकर, किरण पंधाडे, पंकज ताठे, मनोज खेडकर, विक्रम बोरुडे, प्रसाद बोरुडे, निखिल ताठे, गणेश शेलार आदी उपस्थित होते. यावेळी दीपक खेडकर म्हणाले, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने ओबीसी संघटनेच्या शहर जिल्हाध्यक्षपदी निवड केली आहे.ही निवड सार्थ करण्यासाठी ओबीसी संघटनेचे माध्यमातून पक्षाच्या वाढीसाठी व पक्षाची सर्व ध्येय धोरणे सर्वसामान्यांपर्यंत पोहचविण्यासाठी प्रयत्न करेल. तसेच ओबीसी समाजाच्या न्याय हक्क व प्रश्न सोडवण्यासाठी कायम प्रयत्नशील राहू.असे आश्वासन दिले.

# अन्यथा जिल्हाधिकारी कार्यालयात आमरण उपोषण – गोरख दळवी

## अखंड मराठा समाज, अहिल्यानगरचा साखळी उपोषणास पाठिंबा

**जामखेड : (समर्थ गांवकरी)**




जामखेड शहरातील अतिक्रमण हटविण्यासाठी सुरू असलेले साखळी उपोषण व आंदोलन शांततेच्या मार्गाने सुरू आहे. मात्र प्रशासनाने या आंदोलनाची दखल घेऊन शहरातील अनधिकृत अतिक्रमणे तातडीने हटवावीत, अन्यथा येत्या दोन दिवसांत कारवाई न झाल्यास जिल्हाधिकारी कार्यालयात आमरण उपोषण सुरू करण्यात येईल, असा इशारा अखंड मराठा समाज, अहिल्यानगरचे गोरख दळवी यांनी दिला आहे.

जामखेड येथे सामाजिक कार्यकर्ते अवधूत पवार यांनी गेल्या सात दिवसांपासून तहसील कार्यालयासमोर शहर हद्दीतील राष्ट्रीय महामार्गावरील अतिक्रमण हटविण्याच्या मागणीसाठी साखळी उपोषण सुरू केले आहे. या आंदोलनास पाठिंबा देण्यासाठी अखंड मराठा समाज, अहिल्यानगरच्या वतीने गोरख भाऊ दळवी, जगन्नाथ निमसे, गोरक्षनाथ पटारे, सोमनाथ गुंड, सागर भोसले, संदीप जगताप, गणेश नाईकनवरे, रत्नाकर दरेकर (काका), नितीन गव्हाणे, वैभव भोगाडे यांनी बुधवार, दि. ४ मार्च रोजी आंदोलनस्थळी भेट देऊन पाठिंबा दर्शविला. यावेळी त्यांनी नायब तहसीलदार पांडुळे यांचीही भेट घेऊन सुरू असलेल्या साखळी उपोषणावर लवकरात लवकर तोडगा काढावा, अशी मागणी केली.

पुढे बोलताना गोरख दळवी म्हणाले की, जामखेड शहरातील अतिक्रमणाचा प्रश्न दीर्घकाळ प्रलंबित असून त्यामुळे शहराच्या विकासात मोठा अडथळा निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्ते अवधूत पवार यांनी तहसील कार्यालयासमोर शांततेच्या मार्गाने साखळी उपोषण सुरू केले आहे. या आंदोलनाला अखंड मराठा समाज, अहिल्यानगरचा जाहीर पाठिंबा असून या प्रश्नावर तोडगा निघावा यासाठी जिल्हाधिकाऱ्यांशीही चर्चा करण्यात येणार आहे. मात्र प्रशासनाने येत्या दोन दिवसांत शहरातील अतिक्रमण हटविण्याबाबत ठोस निर्णय घेतला नाही, तर जिल्हाधिकारी कार्यालयात आमरण उपोषण सुरू करण्यात येईल, असा इशारा गोरख दळवी यांनी दिला. तसेच शासनाने या आंदोलनातील मागण्या मान्य केल्या नाहीत तर संपूर्ण अहिल्यानगर जिल्ह्यात तीव्र आंदोलन छेडले जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# शिवजन्मोत्सव सोहळा भव्य देखावा शुभारंभ

**संगमनेर : (समर्थ गांवकरी)**

संपूर्ण जगाचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्ताने संगमनेर स्वाभिमानी शहर व तालुका शिव जन्मोत्सव सोहळा समितीच्या वतीने आई तुळजाभवानीच्या भव्य देखाव्याचे उद्घाटन गुरुवार दिनांक 5 मार्च 2026 रोजी सायं. 6 वाजता छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा येथे आयोजित करण्यात आला आहे. हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जन्मदिनाच्या निमित्ताने दरवर्षीप्रमाणे स्वाभिमानी संगमनेर तालुका शिवजन्मोत्सव सोहळा समितीच्या वतीने यावर्षी भव्य देखाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा येथे गुरुवारी 5 मार्च रोजी सायं. 6 वाजता या देखाव्याचे उद्घाटन महाराष्ट्राचे माजी महसूल मंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या शुभहस्ते व मा.आ. डॉ सुधीर तांबे यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे.

# राष्ट्रीय विज्ञान दिन उत्साहात साजरा

**जुन्नर तालुका: (समर्थ गांवकरी)**



रॉयल एज्युकेशन इंग्लिश स्कुल ओतूर येथे राष्ट्रीय विज्ञान दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आल्याची माहिती मुख्याध्यापिका सुजाता कासार यांनी दिली.या कार्यक्रमाचे उद्घाटन रॉयल एज्युकेशन इंग्लिश स्कूल चे आदरणीय पालक,गणेश डुंबरे,मेघश्याम घुले,संजय देशमुख हांडे, जयदीप डुंबरे तसेच सुशांत शिंदे यांच्या शुभहस्ते करण्यात आले या निमित्ताने विद्यार्थ्यांनी रांगोळीच्या माध्यमातून विविध विज्ञान प्रयोग व उपकरणांचे

आकर्षक सादरीकरण केले. तसेच अनेक विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय विज्ञान दिनाविषयीची माहिती उपस्थितांना सांगितली

कार्यक्रमात डॉ.चंद्रशेखर वल्व्हणकर यांनी राष्ट्रीय विज्ञान दिनाचे महत्त्व विशद करत रमण इफेक्ट या प्रयोगाबाबत सविस्तर माहिती दिली.त्यांनी या शोधाचे विविध क्षेत्रांतील उपयोग उदाहरणांसह स्पष्ट केले. यासोबतच डॉ.सी.व्ही. रमण यांना मिळालेल्या नोबेल पारितोषिकाची माहिती उपस्थितांना दिली.यावेळी डॉ. सी.व्ही.रमण यांच्या प्रतिमेला रामदास तांबे यांनी पुष्पहार अर्पण केला.या कार्यक्रमासाठी

रॉयल एजुकेशन इंग्लिश स्कूल, ओतूरचे सर्व विश्वस्त सन्माननीय डॉ.चंद्रशेखर वल्हवणकर, आत्माराम जगताप,वसंतराव तांबे,रामदास तांबे,शाळेच्या मुख्याध्यापिका सुजाता कासार, त्याचप्रमाणे शाळा समन्वयक परिघा कदम,अध्यापिका प्रिया भोर,स्वप्नाली औटी,हिना इनामदार,अश्विनी शिंगोटे,राणी सातपुते,शमा तांबोळी,आरती देशमुख, सोनिया शिंगोटे, नम्रता कुलकर्णी,शितल नलावडे, दिपिका शेटे या सर्वांनी सहकार्य केले.

# गर्भाशय मुखाच्या कर्करोग प्रतिबंधासाठी एचपीव्ही लसीकरण मोहिमेस प्रारंभ

## ९ जानेवारीपासून सर्व आरोग्य केंद्रांत लस उपलब्ध

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

गर्भाशय मुखाचा कर्करोग (Cervical Cancer) प्रतिबंधासाठी जिल्हा परिषद ठाणे अंतर्गत सर्व आरोग्य केंद्रांमध्ये एचपीव्ही (HPV) लस उपलब्ध करून देण्यात आली असून दि. ९ मार्च, २०२६ पासून लसीकरण मोहिमेस सुरुवात करण्यात येणार आहे. या मोहिमेचे उद्घाटन दि. ८ मार्च रोजी करण्यात येणार आहे.

जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे यांनी सर्व पात्र मुली व महिलांनी या लसीकरणाचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे. जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांच्या विशेष मार्गदर्शनाने ही लसीकरण मोहिम ९ जानेवारीपासून पुढील तीन महिने राबविण्यात येणार असून त्यानंतरही नियोजित ठिकाणी नियमित लसीकरण सेवा उपलब्ध राहील.

गर्भाशयाच्या खालच्या टोकाच्या भागाला 'सर्व्हिक्स' (Cervix) म्हणतात. या भागात होणारा कर्करोग म्हणजे गर्भाशय मुखाचा कर्करोग होय. हा कर्करोग सुरुवातीच्या टप्प्यात कोणतीही स्पष्ट लक्षणे न दाखवता वाढू शकतो, त्यामुळे वेळेवर तपासणी आणि प्रतिबंधात्मक लसीकरण अत्यंत महत्त्वाचे आहे.

जवळपास ९९.७ टक्के गर्भाशय मुखाचे कर्करोग ह्युमन पॅपिलोमा व्हायरस (HPV) मुळे होतात. बहुतेक एचपीव्ही संसर्ग लक्षणरहित असतात आणि १ ते २ वर्षांत आपोआप बरे होतात. मात्र काही प्रकार दीर्घकाळ टिकून राहिल्यास कर्करोगपूर्व अवस्था (CIN-1, CIN-2, CIN-3) निर्माण होऊन पुढे कर्करोग होऊ शकतो.

एचपीव्ही हा 'पॅपिलोमाविरिडे' (Papillomaviridae) कुटुंबातील दुहेरी धाग्याचा डीएनए विषाणू आहे. याचे २०० हून अधिक प्रकार आढळतात. त्यापैकी काही 'कमी धोका' तर काही 'जास्त धोका' (कर्करोग निर्माण करणारे) प्रकार म्हणून ओळखले जातात.

सध्या एचपीव्हीचे १७ प्रकार जास्त धोकादायक मानले गेले आहेत. जगभरातील गर्भाशय मुखाच्या कर्करोगाच्या सुमारे ७७ टक्के आणि भारतातील सुमारे ८३ टक्के प्रकरणांसाठी HPV १६ आणि HPV १८ हे प्रकार प्रमुख कारणीभूत ठरतात.

> "गर्भाशय मुखाचा कर्करोग हा टाळता येण्याजोगा आणि लवकर निदान झाल्यास पूर्णपणे बरा होऊ शकणारा आजार आहे. एचपीव्ही लसीकरण हे प्रभावी प्रतिबंधात्मक पाऊल आहे. सर्व पात्र मुलींनी पुढाकार घेऊन लसीकरण करून घ्यावे. तसेच पालकांनीही आपल्या मुलींच्या आरोग्याच्या दृष्टीने जागरूक राहून या मोहिमेत सहभागी व्हावे," असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे यांनी केले आहे.

एचपीव्ही संसर्गामुळे केवळ गर्भाशय मुखाचाच नव्हे तर गुदद्वार, घसा (oropharyngeal), योनीमार्ग (vulvar, vaginal) आणि पुरुषांमध्ये लिंगाचा कर्करोग होण्याचा धोका देखील असतो.

सुरुवातीची लक्षणे

सुरुवातीच्या टप्प्यात सहसा कोणतीही लक्षणे दिसत नाहीत. मात्र पुढील लक्षणे आढळल्यास त्वरित वैद्यकीय सल्ला घ्यावा :

* शरीरसंबंधानंतर, दोन मासिक पाळीच्या दरम्यान किंवा रजोनिवृत्तीनंतर योनीतून रक्तस्त्राव
* पाणीदार किंवा रक्तमिश्रित, दुर्गंधीयुक्त स्त्राव
* तपासणीदरम्यान गर्भाशय मुखाचा भाग असामान्य दिसणे किंवा स्पर्शाने रक्तस्त्राव

रोग वाढल्यास :

* गर्भाशय मुखावर गाठ दिसणे
* ओटीपोटात वेदना किंवा शरीरसंबंधावेळी वेदना
* पायात कळा येणे (सायटिका)
* 'फिस्टुला' तयार होणे

एचपीव्ही लस ही गर्भाशय मुखाच्या कर्करोगाविरुद्ध प्रभावी प्रतिबंधात्मक उपाय आहे. योग्य वयात लसीकरण केल्यास भविष्यात कर्करोगाचा धोका मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकतो. जिल्हा परिषद ठाणे अंतर्गत सर्व प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, जिल्हा शासकीय रुग्णालय / जिल्हा रुग्णालय मध्ये ही लस उपलब्ध करण्यात आली असून नागरिकांनी जवळच्या आरोग्य केंद्राशी संपर्क साधून लसीकरण करून घ्यावे, असे आवाहन आरोग्य विभागामार्फत करण्यात आले आहे. या मोहिमेत Gardasil-4 (Quadrivalent – प्रकार ६, ११, १६, १८ विरुद्ध संरक्षण देणारी) लस वापरण्यात येणार असून ती +२° ते +८° सेल्सिअस तापमानात साठवली जाणार आहे. ही लस गोठविण्यास संवेदनशील (freeze sensitive) असल्याने शीतसाखळीचे काटेकोर पालन केले जाणार आहे. VVM-30 यंत्रणेद्वारे लसीची गुणवत्ता तपासली जाईल. लसीचा एकच डोस (Single-dose schedule) ०.५ मिली इतका असून तो डाव्या वरच्या बाहूच्या स्नायूमध्ये (IM) देण्यात येईल.

लसीकरणासाठी AAM-PHCs, U-PHCs, CHCs, SDH, DH तसेच GMC&H या आरोग्य संस्थांमध्ये CCP, वैद्यकीय अधिकारी, इंटरनेट सुविधा, प्रिंटर व संगणक/लॅपटॉप उपलब्ध ठेवण्यात येणार आहेत.

ही विशेष एचपीव्ही मोहिम तीन महिने दररोज राबविण्यात येईल. त्यानंतर नियमित लसीकरण सत्रांच्या दिवशी त्याच आरोग्य संस्थांमध्ये सेवा सुरू राहील.

या मोहिमेअंतर्गत १४ वर्षे पूर्ण केलेल्या (१४ वा वाढदिवस साजरा केलेला परंतु १५ वा वाढदिवस अद्याप न झालेल्या) मुली हे लक्ष्यित गट असतील. जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येच्या सुमारे १ टक्के मुली या वयोगटात येतात.

लसीकरणासाठी प्रशिक्षित पथकाची नियुक्ती करण्यात आली असून त्यामध्ये लसीकरण करणारे (ANM/LHV/नर्स), जनजागृती व मोबिलायझेशन करणारे (ASHA/AWW/Link Worker), पडताळणी करणारे आरोग्य कर्मचारी तसेच स्वयंसेवक (महिला आरोग्य समिती/जन आरोग्य समिती/आरोग्य कर्मचारी) यांचा समावेश असेल.

# डॉ. सुजय विखे पाटील यांचा जनता दरबार

## नागरिकांच्या अर्जांचा स्वीकार, कार्यकर्त्यांकडून शुभेच्छांचा वर्षाव

**संगमनेर तालुका : (समर्थ गांवकरी)**

भारतीय जनता पक्षाचे नवनियुक्त प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांनी अहिल्यानगर शहरात जनता दरबार घेऊन नागरिकांच्या विविध समस्या व मागण्यांबाबतचे अर्ज स्वीकारले. सकाळी १०.३० ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत ते नागरिकांच्या भेटीसाठी उपलब्ध राहिले असून जिल्ह्यातील विविध भागांतून आलेल्या नागरिकांनी आपल्या अडचणी, सूचना आणि निवेदने त्यांच्या समोर मांडली. विळद घाट येथील इंजिनिअरिंग कॉलेजच्या सेमिनार हॉलमध्ये आयोजित या जनता दरबाराला जिल्ह्यातील विविध भागांतून नागरिक व कार्यकर्त्यांची मोठी उपस्थिती होती. अनेक नागरिकांनी आपल्या प्रश्नांबाबत



लेखी अर्ज सादर केले. डॉ. सुजय विखे पाटील यांनी प्रत्येक अर्ज काळजीपूर्वक ऐकून घेत संबंधित विषयांबाबत योग्य त्या स्तरावर पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले. नागरिकांशी थेट संवाद साधत त्यांच्या अडचणी समजून घेण्याचा प्रयत्न त्यांनी यावेळी केला.

प्रदेश उपाध्यक्षपदी निवड झाल्यानंतर प्रथमच नगरमध्ये आगमन झाल्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये विशेष उत्साहाचे वातावरण होते. मोठ्या संख्येने उपस्थित राहिलेल्या कार्यकर्त्यांनी पुष्पगुच्छ देत त्यांचे स्वागत केले तसेच घोषणाबाजी करत शुभेच्छांचा वर्षाव केला.

यावेळी माध्यमांशी बोलताना डॉ. सुजय विखे पाटील यांनी राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीबाबत संकेत दिले. १० ते १२ मार्च दरम्यान राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीची घोषणा होण्याची शक्यता असल्याचे त्यांनी सांगितले. बंगाल, तमिळनाडू, केरळ, ओडिशा आणि आसाम या राज्यांतील निवडणुकांसोबत महाराष्ट्रातील बारामती व राहुरी या दोन मतदारसंघांच्या पोटनिवडणुकाही जाहीर होण्याची शक्यता असल्याचे त्यांनी नमूद केले.

स्वर्गीय कर्डिले साहेबांच्या निधनानंतर रिक्त झालेल्या राहुरी विधानसभा मतदारसंघाबाबत बोलताना त्यांनी कार्यकर्त्यांच्या भावना व्यक्त केल्या. कर्डिले साहेबांचे चिरंजीव अक्षय कर्डिले यांना उमेदवारी मिळावी, अशी कार्यकर्त्यांची भावना असून अंतिम निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पक्षश्रेष्ठी घेतील, असे त्यांनी स्पष्ट केले. जिल्ह्यातील भाजप संघटना अधिक बळकट करण्यासाठी कार्यकर्त्यांचे योगदान महत्त्वाचे असल्याचे सांगत त्यांनी नमूद केले की, संघटनेत दीर्घकाळ काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना न्याय देणे आणि त्यांना योग्य स्थान मिळवून देणे ही आपली जबाबदारी आहे. कार्यकर्त्यांच्या बळावरच जिल्ह्यात भाजपची ताकद वाढली असून आगामी काळात संघटनात्मक काम अधिक गतिमान करण्यावर भर दिला जाईल. यावेळी बोलताना डॉ. सुजय विखे पाटील यांनी प्रदेश उपाध्यक्षपदी निवड केल्याबद्दल पक्षश्रेष्ठी, कार्यकर्ते आणि हितचिंतकांचे मनापासून आभार मानले. सर्वांच्या विश्वासामुळेच ही जबाबदारी मिळाली असून त्याबद्दल आपण सर्वांचे ऋणी असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

# छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त संगमनेर दुमदुमणार

**संगमनेर : (समर्थ गांवकरी)**

■ भव्य शिवजन्मोत्सव सोहळा व ऐतिहासिक मिरवणूक

हिंदू समाज व शिवसेना-भाजपा महायुती, संगमनेर यांच्या वतीने शुक्रवार दिनांक ६ मार्च रोजी दुपारी ४ वाजता छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त भव्य शिवजन्मोत्सव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. तिथीनुसार साजऱ्या होणाऱ्या शिवजयंतीनिमित्त संपूर्ण शहरातून दिमाखदार मिरवणूक काढण्यात येणार असून शिवप्रेमींमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. या भव्य मिरवणुकीची सुरुवात संगमनेर नगरपरिषद येथून होणार आहे. त्यानंतर मिरवणूक लालबहादूर शास्त्री चौक, बाजारपेठ, तेली खुंट, सय्यद बाबा चौक, मेन रोड, चावडी, अशोक चौक, छत्रपती शिवाजी महाराज स्मारक मार्गे पुढे जात बसस्थानक येथे सांगता होणार



आहे. संपूर्ण मार्गावर ठिकठिकाणी स्वागत कमानी, फुलांची सजावट आणि शिवमय वातावरणाची निर्मिती करण्यात येणार आहे. मिरवणुकीत विविध पारंपरिक व ऐतिहासिक देखावे सादर केले जाणार असून त्यामध्ये सनई-चौघडे, शिवछत्रपती गौरव पालखी, अश्वदर्शन, हिंदू जनजागृती घोष पथक, मर्दानी खेळ, तसेच आदि योगी महादेव यांचा देखावा यांचा समावेश असणार आहे. याशिवाय अफजलखान वधाचा जिवंत देखावा विशेष आकर्षण ठरणार असून अघोरींचा देखावा, किंग स्टार ब्रास बँड पथक (मावळ) आणि एकलव्य ढोल-ताशा पथक यांच्या दमदार सादरीकरणामुळे वातावरण शिवमय होणार आहे. ढोल-ताशांच्या गजरात आणि जयघोषात संपूर्ण संगमनेर दुमदुमून जाणार आहे. शिवसेना-भाजपा महायुतीच्या वतीने संगमनेरमधील सर्व शिवप्रेमी, युवक, महिला व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून शिवजन्मोत्सव सोहळ्यात सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे. याचबरोबर छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा आणि विचारांचा जागर करण्यासाठी तसेच नव्या पिढीपर्यंत स्वराज्याचा संदेश पोहोचविण्याच्या उद्देशाने हा सोहळा आयोजित करण्यात आल्याचे आयोजकांनी सांगितले.

# कन्या विद्यालयात माजी विद्यार्थिनी मेळावा संपन्न



**श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)**

श्रीगोंदा येथील श्रीमंत राजमाता विजयाराजे शिंदे कन्या विद्यालयात माजी विद्यार्थिनीचा स्नेह मेळावा मोठ्या थाटामाटात संपन्न झाला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी रयत शिक्षण संस्थेच्या बॉडीचे सदस्य श्री. कुंडलिकराव दरेकर हे होते. यात्रेच्या निमित्ताने माहेरी आलेल्या अनेक माजी विद्यार्थिनींनी या मेळाव्यास उपस्थिती लावली. कार्यक्रमाचे प्रास्तावित विद्यालयाच्या मुख्याध्यापिका वर्षा भोईटे यांनी केले. या सर्वसाधारण सभेतून विद्यालयाचा माजी विद्यार्थिनी संघ स्थापन करण्यात आला. याची कार्यकारणी निवड विद्यालयाचे पर्यवेक्षक श्री. बाळासाहेब शिंदे यांनी केली. या स्नेह मेळाव्यासाठी विद्यालयातील अनेक माजी शिक्षक देखील उपस्थित होते. विद्यालयातील विद्यार्थिनींनी उपस्थित विद्यार्थिनींचे औक्षण करून स्वागत केले. या स्नेह मेळाव्यात चर्चासत्र, कार्यकारणी निवड, अनुभवांची देवाणघेवाण, जुन्या आठवणींना उजाळा, सेल्फी विथ आयडी कार्ड, सांस्कृतिक कार्यक्रम, अल्पोपहार इत्यादी व्यवस्था विद्यालयाने केली होती. उपस्थित विद्यार्थिनी यावेळी जुन्या आठवणीत रमल्याचे दिसून आले. गप्पा गोष्टी आणि धमाल करत हा स्नेह मेळावा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडला. श्रीम.पुष्पा घोडे यांनी सर्वांचे आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गुरुकुल प्रमुख किरण शिंदे व सचिन गारुडकर यांनी केले.

# नांदेडकरांसाठी प्रशासनाचा पाठपुरावा

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

आज 04 मार्च 2026 रोजी सायंकाळी 05 वाजेपर्यंत नांदेड जिल्ह्यातील एकूण 54 नागरिक हे दुबई, शारजाह, कतार, बहरीन, सौदी अरेबिया या ठिकाणी असून ते सर्व सुरक्षित असल्याबाबतची माहिती जिल्हा आपत्कालीन कार्यकेंद्रास प्राप्त झाली आहे. पालकमंत्री अतुलजी सावे हे सर्व परिस्थितीवर लक्ष ठेवून असून ते परराष्ट्र व्यवहार मंत्रालय, भारत सरकार व राज्य आपत्कालीन कार्यकेंद्र, मंत्रालय, मुंबई यांच्याशी सतत संपर्कात आहेत. या परिस्थितीबाबत त्यांनी जिल्हाधिकारी राहुल करडिले यांच्याशी चर्चा केली व आवश्यक सुचना दिल्या आहे.

# अंभोरे येथील २० आदिवासी बांधवांचा शिवसेनेत प्रवेश

## आमदार खताळ यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रवेश सोहळा



**संगमनेर : (समर्थ गांवकरी)**

संगमनेर तालुक्यातील अंभोरे येथे महायुतीचे नेते सुरजित खेमनर, संतोष बलसाने आणि मंजाबापू साळवे यांच्या पुढाकारातून आदिवासी समाजातील सुमारे वीस बांधवांनी शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. आमदार अमोल खताळ यांच्या प्रमुख उपस्थितीत हा प्रवेश सोहळा उत्साहात पार पडला.

शिवसेनेत प्रवेश केलेल्यांमध्ये रामनाथ बर्डे, पोपट बर्डे, विष्णू बर्डे, मंगेश बर्डे, अर्जुन बर्डे, सुनील पवार, शिवाजी पवार, आशा पवार, संदीप बर्डे, लक्ष्मण जाधव, अर्चना बर्डे, शिवाजी मोरे, सलमान बर्डे, अनिता मोरे, सुरेखा बर्डे, कोंडाजी जाधव, पोपट जाधव आदींचा समावेश आहे. सर्वांनी शिवसेनेचा झेंडा हाती घेत पक्षाशी निष्ठा व्यक्त केली. यावेळी नवप्रवेशित तरुणांनी सांगितले की, कोणत्याही परिस्थितीत या भागात शिवसेनेची ताकद वाढवून आमदार खताळ यांचे हात बळकट करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील राहू. आदिवासी समाजाच्या प्रश्नांसाठी संघटितपणे काम करू.

यावेळी बोलताना आमदार अमोल खताळ म्हणाले की, आदिवासी समाजाचे जे-जे प्रश्न प्रलंबित असतील, ते महायुतीच्या माध्यमातून शंभर टक्के सोडवण्याचा आमचा प्रयत्न राहील. शासनाच्या विविध योजनांचा लाभ प्रत्येक कुटुंबापर्यंत पोहोचवून त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.

> अंभोरे येथील जवळपास वीस आदिवासी बांधवांनी आज शिवसेनेत प्रवेश करून आमच्यावर विश्वास व्यक्त केला आहे. पक्षात त्यांना योग्य तो मान-सन्मान आणि संधी दिली जाईल. त्यांच्या कोणत्याही अडीअडचणी सोडवण्यासाठी आम्ही सदैव तत्पर राहू. जनसंपर्क कार्यालयाच्या माध्यमातून त्यांच्या समस्या तातडीने मार्गी लावल्या जातील. आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी आम्ही ठोस पावले उचलणार आहोत.
>
> **- अमोल खताळ ( आमदार)**

# भारतीय राज्य घटना ही जगातील सर्वश्रेष्ठ राज्य घटना : ॲड. प्रकाश संसारे

**राहुरी : (समर्थ गांवकरी)**

भारतीय राज्य घटना ही जगातील सर्वश्रेष्ठ राज्य घटना असून जगातील इतर देशांनीही त्यांची राज्य घटना बनविणेसाठी भारतीय राज्य घटनेचा आधार घेतला, असे प्रतिपादन जेष्ठ विधिज्ञ व नोटरी पब्लिक ॲड‌ प्रकाश संसारे यांनी केले. श्रीरामपूर येथील सेंटलुक कॉलेज ऑफ नर्सिंग व बॉसको ग्रामीण विकास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पुरुषाचे प्रशिक्षण शिबिर कार्यक्रमात दि. २८/०२/२०२६ रोजी श्रीरामपुर येथील सेंट लुक कॉलेज ऑफ नर्सिंग येथे आयोजित भारतीय राज्य घटना या विषयावर बोलतांना ॲड‌ प्रकाश संसारे यांनी प्रतिपादन केले की , भारतीय राज्य घटनेमध्ये नागरिकांचे हक्क हे अतिशय महत्वपूर्ण असून समतेचा अधिकार, स्वातंत्र्याचा अधिकार, शोषणा विरुध्दचा अधिकार, सांस्कृतिक व शैक्षणिक अधिकार व संविधानिक उपाय योजना अधिकार हे अधिकार



असून हे सर्व अधिकार मानवी स्वातंत्र्याचे रंक्षण करतात.

त्याशिवाय भारतीय राज्य घटनेमध्ये राज्य धोरण निर्देशक मार्गदर्शक तत्वे असून त्यामध्ये स्त्री पुरुषांना उदरनिर्वाहाचे समान साधन व अधिकार मिळणेसाठी, सर्वांना समान न्याय, कामगार व शेतकरी वर्गासाठी तरतुद, बालकांच्या मोफत शिक्षणासाठी तरतुद अशा प्रकारे मार्गदर्शक तत्वे असून शिवाय घटनेमध्ये नागरिकांचे मुलभूल कर्तव्यही समाविष्ट केलेले आहेत. भारतीय राज्य घटनेमध्ये सर्वांना समान न्याय हे तत्व अवलंबविलेले आहे. त्यामुळे समाजातील उच्च, निचता, भेद-भाव, व देशाप्रती जाणीवा निर्माण झालेल्या आहेत. भारतीय राज्य घटना निर्माण करणेमागे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान अतिशय अमूल्य आहे. त्यामुळे त्यांना भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार म्हणतात. सदर कार्यक्रम यशस्वीतेसाठी सोशल वर्क डिपार्टमेंटचे सिस्टर रिटा, सिस्टर जॅकलीन, तेरेजा तेलोरे व सविता धाहिजे यांनी परिश्रम घेतले. सदर शिबिरामध्ये मच्छिंद्र गंगाधर गोलवड, प्रदिप भाऊसाहेब भालेराव, सुनिल आप्पासाहेब पंडीत,

यशवंत चंद्रकांत लोखंडे, रोहन दिपक प्रमुख, प्रदीप विलास ठुबे, इब्राहिम मुसा शेख, संतोष माणिक अमोलिक, अरुण माणिक अमोलिक, भागवत भीमराज काळे, अरुण नाना लोखंडे, खंडू आप्पा झुटींग, अशोक रावसाहेब थोरे, विजय फ्रान्सिस ब्राम्हणे, भगवान गुलाब भालेराव, विलास बी. बनसोडे, पंढरनाथ चांगदेवे, संजय रावसाहेब भालेराव, भाऊसाहेब संतोष आढाव, संजय कारभारी साबळे, पुजा पाटीलबा गाडे, राज कांबळे, मयुर शेलार, भाऊसाहेब तेलोरे, रितेश साळवे, एकनाथ खरात, मिलिंद खरात, सुरेश कांदळकर, सुशिक्षित पंडित, विद्यार्थी पंडित सह. विद्यार्थी उपस्थित होते.

# अभियानाच्या पहिल्या टप्प्याचे आयोजन

**नांदेड जिल्हा: (समर्थ गांवकरी)**

नांदेड दि. ४ मार्च :- छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियानाच्या पहिल्या टप्यामध्ये शासनाच्या सुचनेप्रमाणे नांदेड जिल्ह्यातील सर्व मंडळस्तर व नगरपरिषद-नगरपंचायत स्तरावर शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या अभियानात महसूल विषयक प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यात येणार आहेत. तसेच लोकसेवा हक्क कायद्यानुसार प्रमाणपत्रांचे वितरण, सामाजिक अर्थसहाय्य योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांना लाभ मंजूर करण्यात येणार आहेत, अशी माहिती जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत दिली. तालुक्यातील मंडळ स्तरावर या शिबिराचे आयोजन शनिवार 7 व 14 मार्च 2026 रोजी करण्यात आले आहे.

# महादजी शिंदे विद्यालयातील माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा

## ५० वर्षांनंतर शाळामित्र एकत्र



**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**

श्रीगोंदा येथील रयत शिक्षण संस्थेच्या महादजी शिंदे विद्यालयातील इयत्ता दहावी (सन १९७७) च्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा रविवार, दि. १ मार्च २०२६ रोजी उत्साहात पार पडला. तब्बल ५० वर्षांनंतर शाळामित्र एकत्र आल्याने या स्नेहमेळाव्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले.

दि. १ फेब्रुवारी रोजी आयोजित बैठकीत स्नेहमेळाव्याचे नियोजन करण्यात आले होते. त्यानुसार जुन्या आठवणींना उजाळा देत शिक्षक व शाळेशी असलेले भावनिक नाते अधिक दृढ करण्याचा प्रयत्न या मेळाव्यातून करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी १० ते ११.३० या वेळेत झाली. स्थानिक विद्यार्थ्यांच्या सहकार्याने 'ए स्टार' हॉटेल येथे स्नेहभेट कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विद्यालयाचे माजी शिक्षक, विद्यमान शिक्षक तसेच माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान ओळखपरिचय, सत्कार व स्वागत समारंभ पार पडला. त्यानंतर चहा-पानाची व्यवस्था करण्यात आली.

दुपारच्या सत्रात स्नेहभोजन व इतर मनोरंजनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. एकूण ५७ माजी विद्यार्थी व विद्यार्थिनी या स्नेहमेळाव्यास उपस्थित होते. सर्वांनी एकमेकांच्या सहवासात जुन्या आठवणींना उजाळा देत भावनिक क्षण अनुभवले.

पुढील स्नेहमेळाव्याची तारीख ग्रुपवर ठरवून पुन्हा एकत्र येण्याचा निर्णयही यावेळी घेण्यात आला. या कार्यक्रमामुळे शाळेतील मैत्रीचे बंध अधिक दृढ झाले असून, उपस्थितांनी समाधान व्यक्त केले.

# श्रीगोंदा तालुक्यात 'महसूल समाधान शिबिरां'चे आयोजन

**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**

शासन निर्देशानुसार राज्यभर राबविण्यात येणाऱ्या "छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर अभियान टप्पा - १" अंतर्गत श्रीगोंदा तालुक्यात ७ मार्च ते १३ मे २०२६ या कालावधीत मंडळस्तरावर एकदिवसीय शिबिरे आयोजित करण्यात आली आहेत. तालुक्यातील नागरिकांनी या शिबिरांचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन तहसीलदार सचिन डोंगरे यांनी केले आहे. सर्वसामान्य जनता, शेतकरी, विद्यार्थी व महिलांचे महसूल विभागाशी संबंधित दैनंदिन प्रश्न तत्काळ निकाली काढणे , तक्रारींचा सत्वर निपटारा करणे तसेच महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम व गतिमान करण्यासाठी हे अभियान राबविण्यात येत आहे. नागरिकांच्या सोयीसाठी या शिबिरांचे आयोजन खालीलप्रमाणे करण्यात आले आहे. दि. ७ मार्च २०२६ रोजी काष्टी मंडळासाठी राजयोग मंगल कार्यालय (काष्टी) येथे शिबिर होईल. यानंतर दि. १६ मार्च रोजी चिंभळा मंडळासाठी श्री हंगेश्वर मंदिर (हंगेवाडी), दि. २० मार्च रोजी पेडगाव मंडळासाठी दत्त मंदिर सभागृह (पेडगाव), दि. २७ मार्च रोजी आढळगाव मंडळासाठी श्री सिद्धेश्वर देवस्थान (आढळगाव), दि . २ एप्रिल रोजी बेलवंडी बु. मंडळासाठी श्री छत्रपती विद्यालय हॉल (बेलवंडी बु.), दि. १० एप्रिल रोजी देवदैठण मंडळासाठी महादेव मंदिर (देवदैठण), दि. १७ एप्रिल रोजी लोणी व्यंकनाथ मंडळासाठी जिजाई मंगल कार्यालय (लोणी व्यंकनाथ), दि. २१ एप्रिल रोजी मांडवगण मंडळासाठी श्री संत सावतामाळी मंदिर सभागृह (मांडवगण) आणि दि. २३ एप्रिल रोजी भानगाव मंडळासाठी श्री भानेश्वर (महादेव) मंदिर (भानगाव) येथे शिबिरे होणार आहेत.

# सव्वा वर्षात प्रत्येक गावात विकास निधी दिला : आ. खताळ

## गुंजाळवाडी राजापूर सायखिंडी चिकणी निमगाव भोजापूर; मेंगाळ वाडी येथील विकास कामांचा शुभारंभ

**संगमनेर : (समर्थ गांवकरी)**

आपण सव्वा वर्षाच्या काळात विधानसभा मतदार संघातील प्रत्येक गावा- गावामध्ये निधी देण्याचे काम केले आहे आणि भविष्यातही करू असा विश्वास व्यक्त करत निधी वाटप करताना कधीही भेदभाव केला नाही कोण आपला अन कोण-परका असा भेदभाव केला नाही ज्या भागावरती अन्याय झाला आहे, त्या भागासाठी प्राधान्याने विकासनिधी देण्याचा आपला प्रयत्न आहे.भविष्यात महा युती सरकारच्या माध्यमातून भरीव स्वरूपाचा निधी उपलब्ध करून दिला जाईल, अशी ग्वाही आमदार अमोल खताळ यांनी दिली.



तालुक्यातील गुंजाळवाडी, राजापूर, निमगाव, भोजापुर, चिकणी, सायखिंडी आणि मेंगाळवाडी येथील विविध विकासकामांचा शुभारंभ आमदार खताळ यांच्या हस्ते झाला त्यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी भाजप ज्येष्ठ नेते नामदेव गुंजाळ, राधुनाना गुंजाळ, संभाजी गुंजाळ, सूर्यभान गुंजाळ, पंढरीनाथ गुंजाळ, रोहिदास सोमनाथ जगताप गुंजाळ, देवराज थोरात, विक्रम गुंजाळ, महेश जगताप, गोकुळ गुंजाळ राजापूर येथील, बबन हासे, सावळेराम खतोडे, आनाजी खडांगळे, आण्णा हासे, बाळासाहेब सोनवणे, ऋषिकेश हासे, गोपिनाथ सोनवणे संदेश देशमुख, सोमनाथ खतोडे, निमगाव भोजापूर येथील ज्येष्ठ नेते कारभारी वलवे, सरपंच ज्योती कडलग, उपसरपंच प्रमोद कडलग, दत्तात्रय गुंजाळ, अशोक कानवडे, बाळासाहेब कडलग, लहानू पाटील चाबुस्कर, भाऊसाहेब धुमाळ, संतोष टपाले, त्र्यंबक फटांगरे, मनोहर कडलक, चिकणी येथील भाजप ज्येष्ठ नेते वाल्मिक शिंदे, सरपंच गायत्री माळी, उपसरपंच संदीप वर्पे,मनसेचे उप जिल्हाध्यक्ष दिपक वर्पे, एकनाथ वर्पे, मच्छिन्द्र विखे पाटील आदी मान्यवर उपस्थित होते

आमदार खताळ म्हणाले की, विधान सभा निवडणुकीच्यापूर्वी अनेकांनी केवळ भूमिपूजनाचे फलक लावले, मात्र त्या कामांचे पुढे काय झाले याचा जाब जनतेने विचारणे गरजेचे आहे,येथून मागील कालावधीमध्ये निवडणुका आल्या की फक्त घोषणा व फलक लावून जनतेची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला.महायुती सरकारच्या माध्यमातून झालेला विकास गावागावातील जनतेपर्यंत पोहोचवणे ही कार्यकर्ते म्हणून आपली जबाबदारी आहे.निळवंडे डावा आणि उजवा कालव्यांच्या माध्यमातून पाणीपुरवठा सुरू आहे प्रवरा व म्हाळुंगी नदी वाहती आहे दोन्ही कालव्यांमुळे. गावातील बंधारे व तलाव भरून देण्यासाठी सरकार सहकार्य करत असल्याचे आमदार अमोल खताळ यांनी सांगितले.

> गुंजाळवाडीमध्ये काही जण भीती व दहशतीचे वातावरण निर्माण करत आहे परंतु कार्यकर्त्यांनी त्यांना त्यांच्या घरात जाऊन जाब विचारने गरजेचे आहे, जर महायुतीच्या कार्य कर्त्यांना कोणी विनाकारण त्रास देण्याचा प्रयत्न केला तर त्यांना महायुतीच्या पदाधिकाऱ्यांनी ठामपणे उत्तर देणे गरजेचे आहे चुकीचे काम आम्ही सांगणार नाही; मात्र गावातील शांतता भंग करण्याचा जर कोणी प्रयत्न करत असेल तर त्याच्यावर निश्चितच कारवाई केली जाईल.
>
> **- अमोल खताळ( आमदार)**

# स्नेहसंमेलनातून समाज एकत्र येण्याचा संदेश

## आमदार विक्रमसिंह पाचपुते : ५० वर्षांनंतर माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साहात संपन्न



**श्रीगोंदा तालुका: (समर्थ गांवकरी)**

श्रीगोंदा येथे तब्बल ५० वर्षांनंतर माजी विद्यार्थी-विद्यार्थिनी एकत्र येत आयोजित करण्यात आलेले स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. या कार्यक्रमातून समाजात एकोप्याचा आणि संघटित होण्याचा प्रभावी संदेश देण्यात आला.

यावेळी आमदार विक्रमसिंह पाचपुते यांनी उपस्थितांशी संवाद साधताना सांगितले की, भविष्यात नक्कीच अशा सकारात्मक दृष्टिकोनाचा सर्वांना लाभ होईल. "अशा स्नेहसंमेलनांची परंपरा सर्वत्र पोहोचली, तर अनेकजण प्रेरणा घेऊन अशाच प्रकारचे उपक्रम राबवतील. समाज एकत्र येणे आणि संघटित होणे ही आजच्या काळाची गरज आहे," असे ते म्हणाले.

अलीकडील काळात विविध कारणांमुळे समाज वेगवेगळ्या स्तरांवर विभागला गेला आहे. मात्र राजकारण, समाजकारण किंवा मैत्रीचे बंध असोत—सर्वांनी एकत्र येणे अत्यंत महत्त्वाचे आहे. अशा एकोप्यामुळे समाजाच्या जडणघडणीत भक्कम आधार निर्माण होतो, असेही त्यांनी नमूद केले.

'मुथा परिवाराने' आपल्या निवासस्थानी सर्व माजी विद्यार्थी-विद्यार्थिनींचे स्वागत करून त्यांचा सन्मान केला व शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमास उपस्थित सर्व सहकाऱ्यांचे आभार मानत आमदार पाचपुते यांनी निमंत्रणाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

"आज जरी वाढदिवस एका व्यक्तीचा असला, तरी त्या निमित्ताने उपस्थित सर्वांना माझ्या तसेच पाचपुते परिवाराच्या वतीने भावी आयुष्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा," असेही त्यांनी यावेळी सांगितले.

स्नेहसंमेलनातून एकात्मतेचा संदेश व्यापक पातळीवर पोहोचावा आणि इतरांनीही त्यातून प्रेरणा घेऊन असे उपक्रम राबवावेत, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

# गाव पातळीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलीस पाटलाची भूमिका महत्त्वाची उपमहानिरीक्षक शहाजी उमाप

**मुदखेड: (समर्थ गांवकरी)**



पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये कायदा, सुव्यवस्था व शांतता कायम ठेवण्याकरिता पोलीस पाटलांनी पोलीस ठाण्याशी समन्वय साधून सतर्क असावे, असे आवाहन पोलीस ठाण्याच्या वार्षिक तपासणी दरम्यान नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी केले. त्यांनी पोलीस ठाण्याच्या वार्षिक तपासणी दरम्यान पोलीस पाटील व तंटामुक्त गाव समितीचे अध्यक्ष यांच्याशी संवाद साधला. याप्रसंगी ते बोलत होते. यानिमित्ताने वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक धीरज चव्हाण यांच्या संकल्पनेतून शहर सुरक्षिततेसाठी सीसीटीव्ही कॅमेऱ्याचे संगणकप्रणालीद्वारे उद्घाटनही त्यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक अविनाश कुमार, अप्पर पोलीस अधीक्षक अर्चना पाटील, पोलीस निरीक्षक धीरज चव्हाण यांच्यासह इतर पोलीस अधिकारी, कर्मचारी यांची उपस्थिती होती. या भेटीदरम्यान विशेष पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप IGP नांदेड, अविनाश कुमार पोलीस अधीक्षक नांदेड यांचा पत्रकार नामदेव राहेरे यांनी सत्कार केला. वार्षिक तपासणी दरम्यान बरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी पोलीस ठाण्या अंतर्गत विविध गुन्हे, इतर कायदा व मुव्यवस्थेच्या दृष्टीने पोलीस निरीक्षक धीरज चव्हाण यांच्यामार्फत माहिती जाणून घेतली आणि त्यावर उपाययोजना करण्याच्या सूचना अधिनस्त पोलीस अधिकारी, कर्मचारी यांना दिल्या. त्याचप्रमाणे पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गावपातळीवरील कायदा सुव्यवस्थेच्या दृष्टीने इतर माहिती देखील पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी पोलीस पाटील आणि तंटामुक्त गाव समितीचे यावेळी प्रत्येक गावचे पोलीस पाटील बैठकीस हजर होते.

# राज्यस्तरीय नवचेतना पुरस्काराने राजु पाटील सन्मानित




**बिलोली : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई व महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने सन २०२५- २६ या वर्षाचा जाहीर राज्यस्तरीय नवचेतना पुरस्कार २८ फेब्रुवारी रोजी वाशीम येथे आयोजित पत्रकार संघाच्या २७ व्या राज्यस्तरीय अधिवेशनात केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव व अनेक प्रमुख मान्यवरांच्या हस्ते सदर पुरस्काराचे मानकरी बिलोली चे ज्येष्ठ पत्रकार राजू पाटील शिंपाळकर यांना प्रदान करण्यात आला. बिलोलीचे ज्येष्ठ पत्रकार राजु पाटील शिंपाळकर यांनी सदरील पत्रकार संघाच्या माध्यमातून गेल्या आनेक वर्षा पासुन विविध पदावर काम करीत आसताना सामाजिक उपक्रमा बरोबर विविध कार्यक्रमातुन पत्रकारांसाठी आनेक प्रेरणादायी उपक्रम हाती घेऊन संघटनात्मक कार्य पुढे ते नेटाने नेत असून या विविध कार्याची दखल महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई व महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाने घेऊन त्यांच्या या संयुक्त विद्यमाने दिनांक २८ फेब्रुवारी रोजी जिल्हा वासिम येथे आयोजीत २७ व्या राज्यस्तरीय पत्रकार संघाच्या अधिवेशनात राज्यस्तरीय नवचेतना उत्कृष्ट संघटक पुरस्कार केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव, भागवताचार्य प. पु. रमाकांतजी व्यास प. पु गजानंद माऊली पत्रकार संघाचे प्रदेश कार्याध्यक्ष निलेश सोमानी प्रदेश सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे प्रदेश संपर्क प्रमुख वैभव स्वामी जेष्ठ संपादक डॉ.राजेश राजोरे यांच्यासह अनेक प्रमुख मान्यवरांच्या हस्ते बिलोलीचे जेष्ठ पत्रकार महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे मराठवाडा विभागीय उपाध्यक्ष राजु पाटील शिंपाळकर याना सन्मानचिन्हे व मानपत्र प्रदान करण्यात आले . यावेळी राज्यातील पत्रकार संघांचे पदाधिकारी,पत्रकार बांधव व विविध राजकिय सामाजिक क्षेत्रातील मान्यवर मंडळी मोठ्या संख्येनी उपस्थित होते.

# प्रेम प्रकरणातून एकाचा खून

**बिलोली : (समर्थ गांवकरी)**

बिलोली तालुक्यातील रामतीर्थ पोलीस ठाण्या हद्दीतील मौ. थडी सावळी येथे तरुण दुर्गेश्वर धारासिंग ठाकुर ( २२ )रा. मुतन्याळ ता. बिलोली या युवकाचा प्रेमप्रकारणातून खून केल्याची दक्कादायक घटना घडली आहे, या प्रकरणातील सात आरोपिंना रामतीर्थ पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. तालुक्यातील मौ. थडी सावळी येथील( दि ३) मार्च रोजी सकाळी ७ ते ८ च्या दरम्यानची घटना, थडी सावळीपासून हाकेच्या अंतरावर असलेल्या मूतन्याळ येथील तरुण दुर्गेश्वर धारासिंग ठाकुर ह्यास थडी सावळी येथे गंगासिंह ठाकुन यांच्या घरी आणून तु आमच्या नातलगातील मुलीसोबत अनैतिक संबंध का ठेवलास म्हणून शिवीगाळ करून छाती,पाठीवर व गुप्तआंगावर लाथा बुक्यांनी आणि काळ्या केबलने गंभीर मारहान केली.

# असेंब्लीज ऑफ गॉड चर्च, विसापूरचा ४८वा वर्धापन दिन उत्साहात साजरा

**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**



विसापूर येथील असेंब्लीज ऑफ गॉड चर्चचा ४८वा वर्धापन दिन मंगळवार, दिनांक ३ मार्च २०२६ रोजी उत्साहात आणि भक्तिभावपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. विविध स्तुती-आराधना, प्रार्थना व संदेशांच्या माध्यमातून कार्यक्रमाला आध्यात्मिक उंची लाभली. या कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते म्हणून रेव्ह. दत्ता अमोलिक (नेवासा) उपस्थित होते. आपल्या संदेशात त्यांनी "तुम्ही देवाचे मंदिर आहात आणि तुमच्या मध्ये देवाचा आत्मा वास करतो, हे तुम्हाला ठाऊक नाही काय?" (१ करिंथकर ३:१६) या वचनावर आधारित प्रभावी मार्गदर्शन केले. प्रत्येक विश्वासी हा देवाचे जिवंत मंदिर आहे. त्यामुळे जीवन पवित्र, प्रामाणिक आणि देवाभिमुख ठेवणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

तसेच प्रभू येशू ख्रिस्ताच्या शिकवणीचा संदर्भ देत त्यांनी प्रामाणिकपणा, निष्ठा आणि परिश्रमाचे महत्त्व अधोरेखित केले. "जो पेरतो आणि जो पाणी घालतो ते दोघेही एकच आहेत; प्रत्येकाला आपल्या परिश्रमानुसार फळ मिळेल, कारण आपण देवाचे सहकारी आहोत," (१ करिंथकर ३:८-९) या वचनाचा उल्लेख करत मंडळींना एकात्मतेने कार्य करण्याचे आवाहन केले. विश्वासू जीवन म्हणजे केवळ उपासना नव्हे, तर समाजात प्रेम, सेवा आणि प्रामाणिक आचरण जोपासणे होय, असे त्यांनी स्पष्ट केले. देवाच्या राज्याची इमारत उभी करण्यासाठी प्रत्येकाने स्वतःला आध्यात्मिकदृष्ट्या तयार करणे गरजेचे असल्याचा संदेश त्यांनी दिला.

कार्यक्रमाच्या शेवटी विशेष प्रार्थना करण्यात आली. मोठ्या संख्येने उपस्थित राहिलेल्या मंडळींमुळे सोहळ्याला उत्साहाचे वातावरण लाभले. चर्चचे पास्टर संजय बंडगर यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत करून त्यांचा सत्कार केला. यावेळी सन्माननीय रेव्ह. पास्टर योसेफ वडागळे (श्रीरामपूर), पत्रकार पिटर रनसिंग, नगर जिल्हा पत्रकार सचिव पा. सियोन गोर्डे, पा. खाजेकर, पा. सुनील बरे, पा. घोडके, पा. उजागरे, पा. इंगळे, पा. साळवे, पा. कसोटे, पा. ओहोळ, पा. संजय पारधे (नगर), पा. प्रकाश वाघ, ब्रदर संजय आल्हाट (सचिव) व सौ. पल्लवी आल्हाट (अध्यक्ष, प्रेरणा बहुउद्देशीय फाउंडेशन), आराधना गिते (अशोकनगर क्वायर ग्रुप, श्रीरामपूर), श्री. व्ही.आर. इनामदार (अधीक्षक, विसापूर कारागृह), श्री. बाळासाहेब काटे (शिवसेना तालुका अध्यक्ष), श्री. संदीप भोसले (वन अधिकारी), श्री. काकासाहेब जठार (सरपंच, विसापूर), श्री. संजय जठार (उपसरपंच, विसापूर) आदी मान्यवर तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.

मान्यवरांचा सत्कार ब्रदर बाळासाहेब कांबळे, ब्रदर संजय आल्हाट, सौ. पल्लवी आल्हाट, सौरभ कांबळे, ब्रदर अशोक गरुड, अण्णा वाकचौरे, सिस्टर सोनाली वाकचौरे, सिस्टर शोभा बरे, सिस्टर मनीषा खाजेकर व ब्रदर अमोल उजागरे यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमानंतर स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले.

# दिव्यांग पत्रकार मित्र पुरस्काराने पत्रकारांचा गौरव

■ प्रहार दिव्यांग क्रांती संघटना, श्रीगोंदा यांचा उपक्रम

**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**



"आपण समाजाचं काहीतरी देणे लागतो" या भावनेतून प्रहार दिव्यांग क्रांती संघटना, श्रीगोंदा यांच्या वतीने 'दिव्यांग पत्रकार मित्र' पुरस्कार प्रदान करून सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या पत्रकारांचा गौरव करण्यात आला. पत्रकार अमिन शेख, दत्ता पाचपुते, दादा सोनवणे, पिटर रणसिंग, रामदास कोळपे, पंकज गणवीर आणि योगेश (चंदन आप्पा) चव्हाण यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा सन्मान संघटनेचे तालुका अध्यक्ष सुधीर भालेराव यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. समाजातील दिव्यांग, वंचित आणि दुर्लक्षित घटकांच्या प्रश्नांना न्याय देण्यासाठी सातत्याने लेखणी चालवणाऱ्या या पत्रकारांच्या कार्याची दखल घेत हा पुरस्कार देण्यात आला. अन्यायाविरुद्ध ठामपणे आवाज उठवणारी आणि सत्यासाठी निःपक्षपाती भूमिका घेणारी लेखणी ही लोकशाहीचा मजबूत आधारस्तंभ आहे, याची जाणीव या निमित्ताने अधोरेखित झाली. यावेळी संघटनेचे अध्यक्ष सुधीर भालेराव म्हणाले, "हा सन्मान केवळ पुरस्कार नसून अन्यायाविरुद्ध उभ्या राहिलेल्या निर्भीड लेखणीचा सार्वजनिक गौरव आहे. पत्रकारांनी दिव्यांग आणि वंचित बांधवांच्या समस्या समाजासमोर मांडून प्रशासनाला जागे केले आहे. त्यांच्या लेखणीतून झालेला प्रहार हा परिवर्तनाची नांदी ठरतो. समाजात सकारात्मक बदल घडवण्यासाठी माध्यमांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे आणि अशा पत्रकारांना प्रोत्साहन देणे ही आमची सामाजिक जबाबदारी आहे." या कार्यक्रमास संघटनेचे उपाध्यक्ष किसन बाराते, संतोष हराळ, सचिव सुरेश गलांडे, कार्याध्यक्ष अब्दुल सय्यद, उपकार्याध्यक्ष अकुंश घोडेकर, शहराध्यक्ष सचिन तोडकर, शहर सचिव रोहिदास वडवकर, तसेच काळूराम म्हस्के, संतोष गडकरी, तात्याराम नाळे, बाळासाहेब चाडे, बापू रणदवे, अशोक नगरे, अभिजीत चौधरी, विशाल काळे, शांताराम कोकाटे, अक्षय सुर्यवंशी आदी मान्यवर उपस्थित होते. प्रास्ताविक अब्दुल सय्यद यांनी केले, तर आभार किसन बाराते यांनी मानले. उपस्थितांनी पुरस्कारप्राप्त पत्रकारांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

समाजात दररोज घडणाऱ्या विविध घडामोडींवर लक्ष ठेवून पत्रकार रात्रंदिवस कष्ट घेत असतात. कोणत्याही लाभाची अपेक्षा न ठेवता ते समाजाच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम करतात. अनेकदा त्यांच्या कष्टांची दखल घेतली जात नाही. मात्र, तालुक्यातील प्रहार दिव्यांग क्रांती संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी या कार्याची नोंद घेऊन आदर्श पत्रकारांना 'दिव्यांग पत्रकार मित्र' पुरस्काराने सन्मानित केले.

या संदर्भात दत्ता पाचपुते (जिल्हाध्यक्ष, अहिल्यानगर) यांनी भावना व्यक्त करताना सांगितले की, "दिव्यांग बांधवांनी आमच्या लेखणीची दखल घेतल्याचा आम्हा पत्रकारांना मोठा अभिमान आहे.

# नेतृत्वाला मिळालेली ही संधी प्रेरणादायी

**गोरेगाव : (समर्थ गांवकरी)**

भारतीय जनता पक्षाच्या नव्या प्रदेश कार्यकारिणीत डॉ. सुजय विखे पाटील यांची प्रदेश उपाध्यक्षपदी नुकतीच निवड झाली आहे. या निवड झाल्याबद्दल पारनेर पंचायत समीतीचे सभापती राहुल भैय्या झावरे यांनी विळद घाट येथे डॉ. सुजय विखे पाटील यांचा सत्कार करत एकमेकांना पेढे भरवून आनंदोत्सव साजरा केला. या निवडीबद्दल पारनेर तालुक्यामध्ये जल्लोषाचे वातावरण निर्माण झाले आहे विधानसभा, नगरपालिका व महानगरपालिका निवडणुकांदरम्यान डॉ. विखे पाटील यांनी केलेल्या संघटनात्मक कामाची आणि अहिल्यानगर जिल्ह्यात मिळवलेल्या यशाची दखल पक्षश्रेष्ठींनी घेउन डॉ. सुजय विखे पाटील यांची प्रदेश उपाध्यक्षपदी वर्णी लावली.

# तामसा भागात वाळूचा गोरखधंदा तेजीत

**तामसा : (समर्थ गांवकरी)**

हदगाव तालुक्यातील वानवाडी, वारकवाडी शिवारात कैक वर्षांपासून निसर्ग सौंदर्याने नटलेल्या, परिसराचे सौंदर्य वाढवणाऱ्या डोंगरटेकड्या भुईसपाट केल्या. तालुका आणि जिल्हा प्रशासनाच्या निष्क्रियतेवर ठपका ठेवत आमदार बाबुराव कदम कोहळीकर यांनी हिवाळी अधिवेशनात तालुक्यातील अवैध मुरुम उत्खननाचा लक्षवेधी प्रश्न उपस्थित करुन दोषीवर कारवाईची मागणी केली होती. तरीही प्रशासनाकडून निर्णायक कारवाई होत नाही. त्यामुळे महसूल प्रशासनाच्या लेकी विद्यमान आमदाराच्या तक्रारीला काहीच महत्त्व नाही का? अशी नागरिकांतून कुजबुज सुरू आहे.

महसूल प्रशासनाचा ग्रीन सिग्नल आणि पोलीस प्रशासनाच्या छुप्या मदतीनेच तामसा भागात राजरोसपणे 20 - 25 हायवा, 10 - 15 टिपर, ट्रॅक्टर असा अवैध वाळू वाहतुकीचा गोरखधंदा तेजीत आला आहे. मात्र किमान अर्ध्या दशकात स्थानिक पोलीस आणि महसूल खात्याच्या मंडळ अधिकारी, तलाठी किंवा विशेष पथकाने एकही कारवाई केली नसल्याने मोठे आश्चर्य व्यक्त होत आहे. शासनाचा लाखोंचा महसूल बुडवत तामसा भागात राजरोसपणे वाळूची बेसुमार वाहतूक, मुरुम, दगडांचे अवैध उत्खनन व वाहतुकीने चांगलाच उच्छाद घातला आहे. मात्र महसूलचे मंडळ अधिकारी, तलाठी, विशेष पथक किंवा स्थानिक पोलीस प्रशासन त्या गोरखधंद्यावर कडक कारवाई करण्याऐवजी धंदेचालकांशी सलगी करीत कुंपणच शेत खात असल्याचा प्रकार करतात. त्यावरून वाळू, मुरुमाच्या धंद्यात जवळजवळ सगळ्यांचीच मिलीभगत असल्याचे स्पष्ट होते. शासनाचे उत्पन्न वाढवणाऱ्या गौण खनिज संपत्तीपोटी शासनाच्या तिजोरीत रॉयल्टीतून मोठा महसूल जमा होऊ शकतो. परंतु तो महसूल तिजोरीत जाण्याऐवजी पोलीस आणि महसूलचे लोकसेवक त्यावर परस्पर डल्ला मारण्याचा सोयीस्कर उद्योग करतात, हे वास्तव आहे. उल्लेखनीय म्हणजे 23 मार्च रोजी सोमवारी पहाटे अवैध वाळू वाहतूक करणारे दोन हायवा महसूल विभागाच्या तलाठी, मंडळ अधिकाऱ्यांच्या एका पथकाने तामस्याजवळ पकडले आणि कारवाई न करता तडजोडीअंती सोडून दिल्याची शहरात जोरदार चर्चा रंगली आहे.

# लाईन मेन दिवस उत्साहात साजरा

**तामसा : (समर्थ गांवकरी)**



■ स्मार्ट काळानुसार कर्मचाऱ्यांना भेटवस्तू देऊन सन्मान

महावितरण विज कंपनी तामसा कार्यालयात आज दिनांक चार मार्च रोजी लाईन मेन दिवस साजरा करण्यात आला. तामसा येथे महावितरण विज कंपनी कार्यालयात मोठ्या उत्साहाने लाईन मेन दिवस साजरा करण्यात आला यावेळी वीज वितरण कंपनीचे शाखा अभियंता विनोद वाठोरे, तांत्रिक संघटनेचे विभागीय सचिव सचिन सोनसळे यांच्या हस्ते लाईन मेन कर्मचाऱ्यांना फेटे बांधून आधुनिक काळात गरज असलेल्या वीज सामग्री म्हणून पकड आणि विशेषतः आधुनिक मीटरला मार्क करण्यासाठी मार्कर पेन देऊन सन्मानित करण्यात आलं या या कार्यक्रमात वरिष्ठ तार मार्ग कर्मचारी बजरंग हरणे, सचिन कदम, संदीप जाधव, किशोर उन्हाळे, संकेत गिमेकर,अजय जाधव,गजानन स्वर्णकार, बालाजी शिंदे, अमोल कटकुळे, अभिजीत पवार, साईनाथ कायत्मवाड, रामचंद्र जाधव, शेख बाबू, संतोष मदने, सुकापुरे, मारुती जाधव, माधव ठेंगळ, साहेबराव हमंद सह कर्मचारी उपस्थित होते. आधुनिक काळानुसार वैज्ञानिक तकनीकींना बनविलेल्या स्मार्ट मीटरवर मार्किंग करण्याचा अति आवश्यक मार्कर पेन तार मार्ग कर्मचाऱ्यांना भेटवस्तू म्हणून देण्याचा अभिनव उपक्रम राबवून शाखा अभियंता विनोद वाठोरे यांनी चार मार्ग कर्मचाऱ्यांना भेट वस्तू दिल्या..

# संजय कोठारी यांच्या सामाजिक कामामुळे पोलीस निवांत राहतात

■ पो. नि. दशरथ चौधरी : निबंध व चित्र रेखाटन स्पर्धाचे बक्षीस वितरण संपन्न

**जामखेड : (समर्थ गांवकरी)**



तालुका व परिसरात कोठेही अपघात घडल्या नंतर सर्वात अगोदर मदतीसाठी सामाजिक कार्यकर्ते संजय कोठारी धावुन जातात, रुग्णांना तातडीने मदत होते. त्यांचे सामाजिक काम मोठे आहे, त्यांच्या सामाजिक कामामुळे प्रशासनास देखील मदत होते कारण ते खरे देवदूत आहेत माझ्या आतापर्यंतच्या काळात मला तरी आठवत नाही असे कोणी काम करत असेल असे प्रतिपादन जामखेड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी यांनी व्यक्त केले. सामाजिक कार्यकर्ते संजय कोठारी यांच्या वाढदिवसानिमित्त जैन कॉन्फरन्स चतुर्थ झोन दिल्ली, कोठारी प्रतिष्ठान जामखेड व समर्थ हॉस्पिटल जामखेड यांच्या संयुक्त विद्यमाने राजे छत्रपती शिवाजी महाराज व भगवान महावीर यांच्यावर निबंध व चित्र रेखाटन स्पर्धा जामखेड येथील ल ना होशिंग विद्यालयामध्ये घेण्यात आल्या होत्या. या स्पर्धांचे बक्षिस वितरण समारंभ दि ३ मार्च रोजी कोठारी यांच्या ६३ व्या वाढदिवसा दिवशी विविध मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी हे बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुर्डूवाडी जि. सोलापूर येथील समाजसेवक डॉ. घेवरचंद धोका हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. सुरेश काशीद, नगराध्यक्षा सौ प्रांजलताई अमित चिंतामणी, उद्योजक प्रशांत बोकरिया, युवा उद्योजक गव्हर्मेंट कॉन्ट्रॅक्टर नाशिक भावेश बाफना, ल. ना. होशिंग विद्यालयाचे मुख्याध्यापक बाळासाहेब पारखे विद्यालयाचे पर्यवेक्षक अनिल देडे, जामखेडचे पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी, उपनगराध्यक्ष पोपट राळेभात नगरसेवक , प्रा. विकी घायतडक, मनोज कुलकर्णी अमित चिंतामणी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. पुढे बोलताना पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी म्हणाले की सामाजिक कार्यकर्ते संजय कोठारी यांच्या सामाजिक कामामुळे प्रशासनास मदत होते.

सर्वांच्या आधी आपघात घडला त्या ठिकाणी जाऊन रुग्णांना तातडीने रुग्णालयात उपचार करण्यासाठी दाखल करतात. अनेकवेळा जी अपघाताची घटना आम्हाला माहीत होत नाही ती घटना संजय कोठारी यांच्याकडुन माहीत होते. नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा प्रांजलताई चिंतामणी यांनी शुभेच्छा देताना सांगितले की सामाजिक कार्यकर्ते संजय कोठारी यांचे काम खुप मोठे आहे.

त्यांना देवमाणूस म्हणून लोक पहातात गोरगरिबांचे आर्शिवाद त्यांच्या पाठीशी आहेत. त्यांना दिर्घायुष्य लाभो असे म्हणुन पुढ़ील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. याच बरोबर डॉ. सुरेश काशीद अमित चिंतामणी, पोपट राळेभात, मनोज कुलकर्णी, प्रा. विकी घायतडक, सचिन देशमुख, उद्योजक प्रशांत बोकरिया, युवा उद्योजक गव्हर्मेंट कॉन्ट्रॅक्टर नाशिक, भावेश बाफना, प्रा. मुख्याध्यापक बाळासाहेब पारखे, पर्यवेक्षक अनिल देडे, यांच्यासह अनेक मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या. यावेळी चित्र रेखाटन स्पर्धा आणि निबंध स्पर्धेत ल.ना. होशिंग विद्यालयातील ७०० विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता पैकी चित्रकले स्पर्धेत पाचवी ते दहावी १९ विद्यार्थी विद्यार्थिनी यांना आणि निबंध स्पर्धा पाचवी ते नववी १५ विद्यार्थ्यांनी बक्षीस मिळवले त्यांना ट्राफी व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले आहे या कार्यक्रमास आकुर्डी निगडी प्राधिकरण जैन सावक संघाचे पूर्व अध्यक्ष समाजसेवक सुभाष ललवाणी, अध्यक्ष विजय गांधी, कोषाध्यक्ष नेनसुख मांडोत ,विश्वस्त दिलीप फिरोदिया, सदस्य सुरेश जैन नाशिक येथील मैत्री फाऊंडेशनचे तेजस धाडवाल ,ललीत धाडीवाल, ऍड प्रसाद गीते ,अशीष संचेती , कांतीलाल कोठारी विजय कोठारी राजेंद्र कोठारी सुनील कोठारी राहुल राखेचा आनंद नहार सुमित चानोदिया ,गौरव अरोरा, मनोज कुलथे,प्रा.धनंजय भोसले, अमोल तातेड प्रफुल्ल सोळंकी, किरण रेडे ,मिठूलाल नवलाखा, राजेश गांधी, सचिन देशमुख, डॉ.भरत दारकुंडे, डॉ.रवींद्र बारस्कर, दीपक भोरे, संतोष सरसमकर, तेजस कोठारी संकेत कोठारी, प्रवीण होळकर, विनोद सुराणा , साई भोसले सर, शिवाजी (अण्णा)भोसले आदी उपस्थित होते.

# रंगोत्सवाची दिमाखदार मैफल सुरेल रंगली

## डीवायएसपी पानेगावकर यांच्या गायनाने उधळला भक्तिरंग, अवघा झाला एक रंग

**नायगाव : (समर्थ गांवकरी)**



नायगाव येथे धुळवडीच्या मंगल पर्वावर संतवाणीचा गजर आणि रंगोत्सवाची उधळण करत नायगावातील माणिकनगर परिसरात धुळवड विशेष रंगारंग कार्यक्रम दिमाखात रंगला. संतश्रेष्ठ संत तुकाराम यांच्या अवघा रंग एक झाला, रंगी रंगला श्रीरंग" या अभंगवाणीचा भावार्थ जपत या सांस्कृतिक उपक्रमाने १२ वर्षांची तपपूर्ती पूर्ण करून १३ व्या वर्षाच्या रंगाची उधळण करत रौप्यमहोत्सवी पर्वाकडे वाटचाल सुरू केली. भक्ती, साहित्य, लोकसंस्कृती आणि हास्यरसाचा संगम घडवणारा हा कार्यक्रम मंगळवारी (दि. ३ मार्च) सकाळी ८ वाजता वैष्णव कुंज या, ज्येष्ठ पत्रकार बाळासाहेब पांडे यांच्या निवासस्थानापासून हालगीच्या तालावर नाचत सुरू झाला. माणिकनगर, शिवम नगर, सुंदर नगर, वेंकटेश नगर मार्गे ज्ञानेश्वर नगर येथे व्ही. सी. जाधव (मुस्तापूरकर) यांच्या निवासस्थानी रंगा रंग मित्रमंडळी पोहचली.येथे मुख्य रंगा रंग कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमास विशेष अतिथी म्हणून बिलोली उपविभागीय पोलिस अधिकारी श्याम पानेगावकर उपस्थित होते. शिवराज पाटील होटाळकर, उमाकांतराव देशपांडे, बाबुराव लंगडापुरे, कवी पंडित मामा बेरळीकर तसेच नांदेडचे प्रसिद्ध कथाकार पत्रकार राम तरटे यांची प्रमुख उपस्थिती या कार्यक्रमास लाभली. कार्यक्रमाची सुरुवात गाणरत्न शंकर बिरादार सर यांच्या "तूच सुखकर्ता..." या भक्तिगीताने झाली. साहित्यिक व कवी वीरभद्र मिरेवाड (नांदेड) यांनी हास्यफवाऱ्यांनी सजलेले सुरेख सूत्रसंचालन करून रंगत अधिकच वाढवली. काव्यरत्न वेंकट आनेराये, बालाजी पेटेकर, बालाजी कवळे, बजरंग गादेवार , भंडरवाड सर,यांसह नवोदित कवींनी विनोदाचे चुटकुले सांगत हास्याचे फवारे उडवत काव्यवाचन सादर केले. सप्तसुर साथी संगीतरत्न शंकर बिरादार, ज्ञानेश्वर बैस, बालाजी चौधरी, रमेश जाधव, पंढरी पांचाळ, विकास भुरे, माधव भेदेकर यांच्या गायनाला विश्वेश्वर जोशी यांच्या वादनाची सुरेल साथ लाभली आणि कार्यक्रमात रंगत आली. यावेळी माणिकनगर, गजानन नगर, सहयोग नगर, नगर, बळवंत नगर, शिवम नगर, सुंदर नगर, वेंकटेश नगर, बेळगे नगर , ज्ञानेश्वर नगर,तसेच मॉर्निंग वॉक ग्रुप, पत्रकार बांधव व रंगारंग मित्रमंडळींचा उत्स्फूर्त सहभाग लाभला.

# भागवत सुनेवाड लिखित 'जत्रा' या कथासंग्रहाचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन संपन्न




**अर्धापूर : (समर्थ गांवकरी)**

जिल्हा परिषद हायस्कूल मालेगाव येथील उपक्रमशील, विद्यार्थी प्रिय, तंत्रस्नेही शिक्षक भागवत सुनेवाड लिखित जत्रा या कथासंग्रहाचे प्रकाशन नुकतेच प्रशालेच्या कार्यक्रमात संपन्न झाले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक रावसाहेब पुप्पलवाड हे होते.तर प्रमुख पाहुणे म्हणून शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य तथा माजी सरपंच अनिल इंगोले, ज्येष्ठ शिक्षिका मीनाक्षी मुपडे, नंदू घाटोळे यांची उपस्थिती होती. याच कार्यक्रमात स्वेच्छानिवृत्तीने होत असलेले विद्यार्थी प्रिय शिक्षक नंदू घाटोळे यांना सेवानिवृत्ती बद्दल प्रशालेच्या वतीने सपत्नीक सत्कार करून निरोप देण्यात आला. तसेच नरंगले अकॅडमी, नांदेड तर्फे देण्यात येणारा 'गुणवंत शिक्षक' पुरस्कार मिळाल्याबद्दल गणेश शिराळ यांचाही प्रशालेच्या वतीने सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ऋषिता गवळी आणि सिद्धी कांबळे यांनी केले तर आभार प्रदर्शन लेखक भागवत सुनेवाड यांनी मानले.यावेळी प्रशालेतील सर्व शिक्षक बंधू भगिनी व विद्यार्थी उपस्थित होते.

# शाश्वत पाण्यासाठी जिल्ह्यात ८ ते २२ मार्च दरम्यान जलमहोत्सव

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

ग्रामीण पाणी पुरवठा यंत्रणा अधिक शाश्वत व मजबूत करण्यासाठी सामुदायिक सहभाग वाढवण्यासाठी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार जिल्ह्यात दि. ८ ते २२ मार्च दरम्यान जलमहोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे, यात सर्व नागरिकांनी सहभाग घ्यावा असे आवाहन नांदेड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांनी केले आहे. पाणी ही केवळ पायाभूत सुविधांची बाब राहिलेली नाही तर ती सांस्कृतिक पद्धती म्हणुन पाण्याची जपणूक करावी. पाण्याच्या संवर्धना साठी स्थानिक परंपरा यांचा उपयोग मुख्यत : विचारात घ्यावेत. गावागावात पाणी तपासणीसाठी महिलांना प्रोत्साहन देणे, फिल्ड टेस्टिंग किटद्वारे पाण्याची गुणवत्ता तपासणी करणे. प्रत्येक गावात युवकांचा जल सवर्धनासाठी

**सीईओ मेघना**

सहभाग घेणेसाठी यंग ब्रिग्रेडची स्थापना करावी. जिल्ह्यातील शाळांमध्ये जलसंवर्धनासाठी स्पर्धाचे आयोजन करण्यात येणार आहे. तसेच ग्रामपंचायत विकास आराखड्यात पाण्याच्या संवर्धानासाठी उपाययोजनांचा समावेश या महोत्सवांतर्गत करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील गावोगावी पाणी पुरवठा व स्वच्छता विभागामार्फत विविध उपक्रम या प्रसंगी राबवले जाणार आहेत.

पाणी पुरवठा सामुदायिक जीवनामध्ये खोलवर रुजलेली एक महत्वाची बाब आहे. ग्रामीण पाणी पुरवठा यंत्रणा आधिक शाश्वत आणि मजबूत करण्यासाठी सामुदायिक लोकसहभाग वाढवण्यासाठी दि. ८ ते २२ मार्च या कालावधीत जलमहोत्सव राबवला जाणार आहे अशी माहिती पाणी व स्वच्छता विभागाचे प्रकल्प संचालक तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी मयूरकुमार आंदेलवाड यांनी दिली.

गाव व पंचायत समिती स्तरावर लोक जल उत्सव आयोजित केला जाईल. जो पूर्णपणे लोकसहभागावर आधारीत असणार आहे. पिण्याच्या पाण्याला सांस्कृतिक आणि सामाजिक प्राधान्य देणे, स्थानिक जलउत्सव संस्थांत्मक करण्यासाठी प्रोत्साहित करणे, राज्य ते गावस्तरापर्यंत विविध विभागांमध्ये समन्वय साधणे, पाणी गुणवत्ता, सौर ऊर्जा आणि देखभाल दुरूस्तीसाठी दिर्घकालीन आराखडा तयार करणे, आरोग्य, पोषण आणि महिला सक्षमीकरणाला जलसेवेशी जोडणे हा जलमहोत्सवाच्या उपक्रमामागचा उद्देश आहे अशी माहिती ग्रापापु विभागाचे कार्यकारी अभियंता राहूल रावसाहेब यांनी दिली आहे.

# बिलोली तालुक्यात प्रेम प्रकरणातून खूण

**बिलोली : (समर्थ गांवकरी)**

बिलोली तालुक्यातील थडी सावळी येथे प्रेम प्रकरणातून २२ वर्षीय तरुणाचा खून झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. मृत तरुणाचे नाव दुर्गेश्वर धारासिंग ठाकूर असे असून, प्राथमिक माहितीनुसार प्रेमसंबंधातून निर्माण झालेला वाद वाढत गेला आणि त्यातूनच ही गंभीर घटना घडल्याचे समोर येत आहे. ही घटना रामतीर्थ पोलीस ठाणे हद्दीत घडली असून पोलिसांनी तात्काळ कारवाई करत पाच संशयित आरोपींना ताब्यात घेतल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली आहे. घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी श्याम पानेगावकर यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा व तपासाची पाहणी केली.

# भोई प्रतिष्ठानच्या 'रंग बरसे' रंगमहोत्सव उत्साहात अर्धापूरतील आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांनी लुटला आनंद

**अर्धापूर : (समर्थ गांवकरी)**



तालुक्यातील आत्महत्या केलेल्या शेतकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांनी भोई प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या रंग बरसे रंगोत्सवात सहभागी होऊन रंगाची मुक्तहस्ताने उधळण करीत रंगपंचमी साजरी केली.

पुण्यातील भोई प्रतिष्ठानच्या वतीने दरवर्षी समाजातील वंचित घटक व विशेष मुलांसाठी रंग बरसे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते.या रंगोत्सवाचे हे ३१ वे वर्ष आहे.

या रंगोत्सवात "रंग बरसे भीगे चुनरवाली...", "खंडेरायाच्या लग्नाला...", "ब्राझील...", "सैराट..." अशा धमाल गाण्यांच्या तालावर पाण्याचे फवारे, नैसर्गिक व पर्यावरणपूरक रंगांची मुक्त उधळण आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांसोबत नृत्य करत विशेष मुले अक्षरशः रंगून गेली होती..

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी विशेष मुले, अंध मुले, मूकबधिर मुले, आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील मुले, रेल्वे प्लॅटफॉर्मवर बूट पॉलिश करणारी मुले, डोंबारी खेळ करणारी मुले, देवदासी भगिनींची मुले तसेच ऊसतोड कामगारांची मुले अशा विविध घटकांतील सुमारे अडीच हजार बालमित्रांनी या महोत्सवात उत्स्फूर्त सहभाग नोंदवत रंगांची धमाल अनुभवली. मुलांच्या स्वागतासाठी पर्यावरणपूरक नैसर्गिक रंग, पोलीस बँड, पिचकारी, नाष्टा व स्नेहभोजन असा संपूर्ण लवाजमा सज्ज होता. त्यांच्या आवडीच्या गाण्यांवर नृत्य करताना आणि पाण्याच्या फवाऱ्यांमध्ये नाचताना मुले हरखून गेली होती. या रंगमहोत्सवात खा. डॉ. मेधा कुलकर्णी, महापौर . मंजुषा नागपूरे, उपमहापौर परशुराम वाडेकर, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर यांच्यासह विविध पक्षांचे नगरसेवक, लोकप्रतिनिधी आणि पोलीस अधिकारी उपस्थित होते. 'पुण्य जागर' प्रकल्पाचे समन्वयक लक्ष्मीकांत मुळे, गुणवंत वीरकर, . दत्ता टोकलवाड , प्रवीण रावते , संदिप राऊत, आनंद मोरे आदींनी रंगोत्सवात सहभाग घेतला. कार्यक्रमाचे संयोजक व भोई प्रतिष्ठान चे अध्यक्ष प्रा. डॉ. मिलिंद भोई यांनी प्रास्ताविकात सांगितले की, "विशेष मुलांच्या आयुष्यात आनंद, उत्साह आणि मांगल्याचे रंग भरावेत हा उपक्रम सातत्याने राबवला जात आहे अशा भावना व्यक्त केल्या. या रंगोत्सवात नेक्स्ट जेन मूकबधिर मुलांची संस्था, ज्ञान गंगोत्री मतिमंद मुलांची संस्था, अस्तित्व गुरुकुल, समर्पण संस्था, एनेबलर फाउंडेशन, बचपन वर्ल्ड फोरम, वंचित विकास, वाघमोडे प्रतिष्ठान, अलका फाउंडेशन, अक्षर स्पर्श, जिजाऊ फाउंडेशन, कसबा संस्कार केंद्र, पर्वती दर्शन बालसंस्कार केंद्र, सूर्योदय सोशल फाउंडेशन, आयडेंटिटी फाउंडेशन, स्वाधार संस्था, श्री संत गजानन महाराज शिक्षण संस्था, अनिकेत सेवाभावी संस्था आदी संस्थांतील बालगोपाळांनी सहभाग घेत धुलीवंदनाचा आनंद लुटला.

# पारनेर येथे शिवसेना (शिंदे गट) पदाधिकारी निवडी जाहीर

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**



पारनेर तालुक्यात शिवसेना (शिंदे गट) पदाधिकाऱ्यांच्या निवडीची प्रक्रिया यशस्वीरित्या पार पडली. या निवडीत पारनेर तालुका शेतकरी संघटनाच्या तालुका प्रमुखपदी श्री. महेंद्र पांढरकर यांची निवड करण्यात आली. तालुका उपप्रमुखपदी श्री. राजेंद्र सर्जेराव रोकडे तर तालुका संघटकपदी श्री. शिवाजी कारभारी शिंगोटे यांची नियुक्ती झाली.

याशिवाय, जवळा गावातील श्रीमती सुनीता सतीश पठारे यांची पारनेरकर स्थित मुंबई महिला संघटक पदावर निवड झाली आहे. या निवडीमुळे तालुक्यातील शेतकरी, महिला आणि संघटनेतील कार्यकर्त्यांना नवीन जबाबदाऱ्या मिळाल्या असून, पक्षाच्या स्थानिक पातळीवरील कामाला चालना मिळण्याची अपेक्षा आहे.

निवड प्रक्रियेला तालुका प्रमुख अरुणराव ठाणगे, जिल्हा ओबीसी सेल प्रमुख खंडुजी भुकन साहेब, तालुका महिला प्रमुख कोमलताई भंडारी, जिल्हा संघटक संदीप कपाळे, रविंद्र पाडळकर, सुभाष वराळ, बाळासाहेब नगरे, संतोष भंडारी, भीमा औटी, कर्ण रोकडे, योगेश रोकडे, संदीप खंडागळे, नवनाथ विचारे, माऊली गायकवाड, अशोक गजानन सोमवंशी, प्रशांत रासकर, चंद्रकांत कुलकर्णी, कैलास नन्हे यांच्यासह शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमात सर्वांनी एकत्र येऊन पक्षाच्या भविष्यासाठी संकल्प व्यक्त केला. नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांनी शेतकरी, महिला आणि युवकांच्या हितासाठी कार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला. पारनेर तालुक्यात शिवसेनेची संघटना अधिक मजबूत होण्यासाठी ही निवड महत्त्वाची ठरली आहे.

# आजचे विज्ञान उद्याचे तंत्रज्ञान : डॉ. शशिकांत शिंदे

**अहमदनगर: (समर्थ गांवकरी)**

आजचे विज्ञान उद्याचे तंत्रज्ञानआहे त्यामुळे विद्यार्थ्यांनी बहुविष्याचे ज्ञान घ्यावे असे प्रतिपादन डॉ. शशिकांत शिंदे याने राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त आपल्या प्रमुख व्याख्यानात केले. अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे श्री ढोकेश्वर कॉलेज येथे राष्ट्रीय विज्ञान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमासाठी प्रमुख व्याख्याते म्हणून प्रा. डॉ. शशिकांत शिंदे उपस्थित होते. आपल्या प्रमुख भाषणात त्यांनी विज्ञानातील नवसंशोधन, संशोधनवृत्ती आणि तंत्रज्ञान विकास यांचे महत्त्व अधोरेखित केले. आजच्या विज्ञानातील प्रयोग आणि संशोधन हेच उद्याच्या प्रगत तंत्रज्ञानाचा पाया ठरतात, असे सांगून त्यांनी विद्यार्थ्यांना वैज्ञानिक दृष्टिकोन जोपासण्याचे आवाहन केले.

*'स्वारातीम' विद्यापीठाचे संस्थापक कुलगुरू*

# डॉ. जनार्दन वाघमारे यांना भावपूर्ण श्रद्धांजली

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**



स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे संस्थापक कुलगुरू आणि थोर विचारवंत डॉ. जनार्दन वाघमारे यांचे सोमवार, दि.०२ मार्च, २०२६ रोजी दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनामुळे शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रावर शोककळा पसरली असून, विद्यापीठ परिवाराच्या वतीने त्यांना आज भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीतील स्वागत कक्षात आज बुधवार, दि.०४ मार्च, २०२६ रोजी श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपस्थित सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून दिवंगत डॉ. वाघमारे यांच्या स्मृतीस अभिवादन केले. या श्रद्धांजली सभेला विद्यापीठातील प्रामुख्याने प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, प्रभारी कुलसचिव तथा विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ.एम.के. पाटील, आंतरविद्याशाखीय अभ्यास मंडळाचे अधिष्ठाता डॉ.चंद्रकांत बाविस्कर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक हुशारसिंग साबळे, वित्त व लेखाधिकारी डॉ. राजेश शिंदे, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ.शैलेश वाढेर, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. राजपालसिंह चिखलीकर, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ.मारुती गायकवाड यांच्यासह विद्यापीठातील विविध विभागांचे प्रमुख, शिक्षक. प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

डॉ. जनार्दन वाघमारे यांनी विद्यापीठाच्या स्थापनेत आणि जडणघडणीत मोलाचे योगदान दिले होते. त्यांच्या जाण्याने केवळ विद्यापीठाचेच नव्हे, तर संपूर्ण शैक्षणिक, सामाजिक विश्वाचे कधीही न भरून निघणारे नुकसान झाले आहे, अशा भावना यावेळी व्यक्त करण्यात आल्या. विद्यापीठ परिसरातील वातावरण अत्यंत शोकाकुल झाले होते.

# अकोलेत दिव्यांगांसाठी शिबीर

**अकोले : (समर्थ गांवकरी)**

इंडियन ऑइल कॉर्पोरेशन लिमिटेड यांच्या सीएसआर योजने अंतर्गत दिव्यांगजनांना मोफत सहाय्यक साधने व उपकरणे उपलब्ध करून देण्यासाठी भारतीय कृत्रिम अंग निर्माण निगम व जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सदर शिबीर रविवार दि. ८ मार्च रोजी सकाळी १० ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत अगस्ति माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय अकोले येथे होणार आहे. या शिबिरामध्ये व्हील-चेअर, कुबड्या, चालण्याच्या काठ्या, श्रवणयत्र, ८० टक्के अस्थिव्यंग असलेल्या व्यक्तींसाठी बॅटरीवर चालण-ारी तीनचाकी सायकल, सेरेब्रल पाल्सी खुर्ची, अंध व्यक्तींसाठी ब्रेल किट, सुगम्य केन, स्मार्टफोन, एडीएल किट, रोलेटर्स, बॅटरी चलित व्हीलचेअर, टीएलएम किट इत्यादी सहाय्यक साधनांसाठी पात्र लाभार्थ्यांची तपासणी व नोंदणी करण्यात येणार आहे. भारत सरकारच्या पात्रता निकष व मार्गदर्शक तत्त्वांनुसार लाभार्थ्यांची नोंदणी करून ३१ मार्चपर्यंत वितरण करण्यात येणार आहे. या शिबिराचा लाभघेण्यासाठी लाभार्थ्यांनी आधारकार्ड व रेशनकार्डची मूळ प्रत तसेच एक छायांकित प्रत सोबत आणणे आवश्यक आहे. तसेच पात्रतेनुसार संबंधित दिव्यांग व्यक्तीने यापूर्वी मागील तीन वर्षांत केंद्र शासनाच्या कोणत्याही योजनेतून सहाय्यक साधने घेतलेली नसावीत. या शिबिराचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे अकोले तालुक्यातील दुर्गम व आदिवासी भागातील प्रत्येक दिव्यांग व्यक्तीपर्यंत आवश्यक सहाय्यक उपकरणे पोहोचवून त्यांचे जीवन अधिक सुलभव सोयीस्कर बनवणे आहे, असे प्रतिपादन जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्राचे डॉ. सुजय विखे पाटील यांनी केले आहे. यावेळी विखे पाटील मेमोरियल अहिल्यानगर येथील तज्ज्ञ डॉक्टरांकडून दिव्यांग बांधवांची आरोग्य तपासणी देखील करण्यात येणार आहे. तरी या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# 'राजदेवांसारखे सारखे कार्यकर्ते प्रत्येक गावात हवेत!'

## खा. नीलेश लंके यांची अपेक्षा : वाढदिवसानिमित्त रक्तदान, नेत्रतपासणी व वृद्धांना काठ्यांचे वाटप

**नांदूरपठार : (समर्थ गांवकरी)**



"प्रत्येक गावात रविंद्र राजदेव यांच्यासारखा कार्यकर्ता उभा राहिला, तर तालुक्यात आरोग्य, शिक्षण आणि सर्वसामान्यांचा एकही प्रश्न शिल्लक राहणार नाही," असे प्रतिपादन खासदार नीलेश लंके यांनी केले. नांदूरपठारचे माजी सरपंच रविंद्र राजदेव यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित रक्तदान शिबिर, डोळे तपासणी शिबिर आणि वृद्धांना काठ्यांचे वाटप कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी पारनेरच्या नगराध्यक्ष विद्याताई कावरे ,उपनगराध्यक्ष सुप्रियाताई शिंदे ,पंचायत समिती सदस्य जुन्नर शांताराम दाते,नांदूर पठार सेवा सोसायटी चे व्हा. चेअरमन बाळू चौधरी यांची निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. यावेळी दीपक लंके ,राणीताई लंके ,मोहनराव रोकडे ,अशोक घुले ,किरण ठुबे ,प्रसाद नवले , महेंद्र गायकवाड, दिनेश चौगुले ,पोपटराव गुंड ,बाळासाहेब गुंड ,दिपालीताई औटी ,सारिकाताई आग्रे ,प्रकाश चिकने,गंगाराम चिकने,पांडुरंग येवले , अर्जुन भालेकर ,योगेश मते , डॉ बाळासाहेब कावरे , बाळासाहेब पुंडे ,बापूसाहेब ठुबे, अजित भाईक, हरिभाऊ आहेर ,नारायण राजदेव , भानुदास आग्रे ,जयराम चौधरी ,दिनेश आग्रे ,मदन देशमाने ,दत्ता चौधरी गटातील सर्व आजी माजी पदाधिकारी उपस्थित होते. प्रास्ताविक सोनिया राजदेव यांनी तर आभार रविंद्र राजदेव यांनी मानले. वाढदिवस म्हटला की डीजे, फटाके आणि बॅनरबाजी अशी परंपरा रूढ झाली आहे. मात्र राजदेव यांनी वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिर, नेत्रतपासणी आणि वयोवृद्धांना आधारासाठी काठ्यांचे वाटप करून समाजोपयोगी संदेश दिला. "येथे संकलित होणाऱ्या एका रक्तपिशवीमुळे एक जीव वाचतो, त्याचे कुटुंब वाचते," असे सांगत खा. लंके यांनी या उपक्रमाचे कौतुक केले. "एखाद्या व्यक्तीला सामान्य मदत आठ दिवसांनी दिली तरी चालते; मात्र वैद्यकीय उपचारासाठी मदत तात्काळ लागते. आरोग्य आणि शिक्षणासाठी विलंब चालत नाही," असे स्पष्ट करत त्यांनी राजदेव यांच्या कार्यपद्धतीचे कौतुक केले. "आरोग्य-शिक्षणासाठी तत्परतेने धावणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे रविंद्र राजदेव," असे ते म्हणाले. जिल्हा परिषद निवडणुकीच्या संदर्भात बोलताना खा. लंके यांनी मिश्किल शैलीत वातावरण हलके केले. "अनेकांनी रविंद्र राजदेव यांचा विचार करा असे सांगितले, तर काहींनी त्यांच्या पत्नी सोनिया यांची शिफारस केली. तुम्ही दोघांनी ठरवा माझा की तुझा नंबर? एकमत न झाल्यास छापा-काटा करा, नाहीतर 'शोले' चित्रपटातील सिक्का आणा!" असे म्हणताच उपस्थितांत एकच हशा पिकला. "समय से पहले और भाग्य से अधिक किसी को कुछ नहीं मिलता. मात्र कष्ट करत राहा; कर्म तुमच्यासोबत असते," असे सांगत त्यांनी राजदेव दाम्पत्याच्या समाजकार्याचा गौरव केला. "राजकारणात अनेक जण निवडणुकीपुरते फिरतात. निवडणूक झाली की लोकांना नमस्कारही करत नाहीत. मात्र राजदेव सरपंचपदापासून सातत्याने काम करत आहेत. त्यांनी कुटुंबाचा विचार न करता समाजासाठी स्वतःला वाहून घेतले," असे ते म्हणाले."निवडणूक आली की वयोवृद्धांची आठवण होते; इतर वेळी कोणी ढुंकूनही पाहत नाही. मात्र दुर्लक्षित वृद्धांच्या आरोग्याची काळजी घेण्याचे काम राजदेव दाम्पत्य करत आहे," असे सांगत त्यांनी या कार्याची प्रशंसा केली. कोणत्याही सामाजिक कार्यकर्त्याचे मूल्यमापन आर्थिक ताकदीवर नव्हे, तर समाजासाठी केलेल्या कामावर झाले पाहिजे, असे मत व्यक्त करत खा. लंके म्हणाले, "रात्री-अपरात्री फोन केल्यावर मदतीला धावणारा कार्यकर्ता महत्त्वाचा असतो. मतदान विकले जाऊ नये; ते स्वाभिमानी असावे.